# 'स्व' - रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००६



पदोपदी पसरुन निखारे आपुल्याच हाती
होऊनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती
कधि न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार
होता पायतळी अंगार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

- कुसुमाग्रज

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००६

**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ

श्री. श्रीकांत सामळ

श्री. शिरीष पटवर्धन

सौ. बागेश्री पोंक्षे

श्री. सुनील कुलकर्णी

श्री. कृ. गो. लवळेकर

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०

किंमत रूपये ५/-

वार्षिक वर्गणी रूपये १००/-

(विशेषांकासह)

आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त

चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी या

नावाने काढावा.

## अंतरंग

- हृद्गत
- विशेष लेख
- वार्षिक कार्यक्रम वृत्त
- विभागशः वार्षिक वृत्त
- आर्थिक स्वास्थ्य चिकित्सा

**छपाई**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

वार्षिक विशेषांक — मुखपृष्ठ : श्री. अवधूत फडणीस

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

✲ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर ✲ श्री. प्रमोद चौधरी

### संस्थापक सदस्य

- श्री. पु. व. श्रॉफ
- श्री. श्री.शं. सामळ
- श्री. रा. प. देसाई
- श्री. कां. गि. शहा
- श्री. कृ. गो. लवळेकर
- श्री. वा. दे. संचेती
- कृ. ल. पटवर्धन
- अ. न. गोगावले
- दत्तोबा तांबे

### विद्यमान कार्यकारी समिति

**अध्यक्ष**

*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

**उपाध्यक्ष**

*श्री. प्रतापराव पवार*
*श्री. उदय गुजर*
*श्री. अविनाश वारदेकर*

**कार्याध्यक्ष**

*श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ*

**सहकार्याध्यक्ष**

*श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी*
*श्री. शिरीष पटवर्धन*

**कोषाध्यक्ष**

*श्री. श्रीकांत सामळ*

**कार्यवाह**

*श्री. संजय तांबट*

**सहकार्यवाह**

- *श्री. ज्ञानेश पुरंदरे*
- *श्री. अविनाश जोशी*
- *श्रीमती पुष्पाताई नडे*

**सदस्य**

- *श्री. कन्हैयालाल बलदोटा*
- *श्री जयंत कवठेकर*
- *श्री. रामभाऊ डिंबळे*
- *ॲड. सौ. निलिमाताई गोखले*
- *सौ. बागेश्री पोंक्षे*
- *प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर*
- *श्री. सुनील कुलकर्णी*
- *श्री. विलास कुलकर्णी*
- *श्री. विनोद बिबवे*
- *कु. दीपाली पवार*
- *श्री. अरविंद केळकर*
- *श्री. पराग लकडे*

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**
**आयकर सवलत - ५०% कलम ८० जी प्रमाणे, १००% कलम ३५ एसी प्रमाणे** (३१।१।२००७ पर्यंत)
संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१० (निवास) २४२२१७७०
ई-मेल : swaroopwardhinee@vsnl.net वेबसाईट : http://www.geocities.com/wardhinee/
**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

राष्ट्रहिताला प्राधान्य देऊन आपलं जीवन घडवावं, ते विकसित करावं आणि प्रसंगी देशासाठी समर्पित व्हावं हे 'स्व'-रूपवर्धिनीचं उद्दिष्ट आहे. शहीद भगतसिंग हे या विचारांना पुष्टी देणारं, प्रेरणा देणारं, उदाहरण आहे. हे वर्ष त्यांच्या जन्मशताब्दीसं आहे. त्यांच्या स्मृतीतून वर्धकांना, कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरेल असे मुखपृष्ठ या कार्यवृत्तासाठी चित्रित केले आहे. वर्धिनीच्या उद्दिष्टाला समोर ठेवूनच सर्व कार्यक्रमांची रचना केलेली असते. कार्यक्रमांची रचना आणि त्यांची कार्यवाही सर्वांच्या विचारानं आणि सर्वांनी मिळून केली जाते. अशा रचनेतूनच कार्यक्रम यशस्वी होतात आणि प्रभावीही ठरतात. अशा कार्यक्रमातून समाजमन प्रेरित होतं आणि सक्रीयही होतं. मग आहोरात्र कष्ट करुन, चहाची गाडी चालवून, जमा केलेल्या तुटपुंज्या पुंजीतून एकेक रुपया बाजूला ठेवून वर्धिनीला अकरा हजारांची भरघोस देणगी दिली जाते किंवा कृतज्ञतेचं प्रतीक म्हणून वर्धिनीच्या बालवाडीतल्या एखाद्या चिमूरडीकडून बाईंच्या वाढदिवसाला चॉकलेटच्या वेष्टणाचं फुलपाखरु भेट म्हणून दिलं जातं.

आजच्या समाजस्थितीच्या पार्श्वभूमीवर हे सर्व उठून दिसणारं आहे. आशेची पालवी दाखविणारं आहे हा आशेचा धागा धरुनच कार्यकर्त्यांना पुढे जायचे आहे.

पुढचा प्रवास मात्र खडतर आहे. आज अनेक मने दुभंगलेली आहेत, दुखावलेली आहेत. मूठभर स्वार्थी मदांधांच्यामुळे समाजात दरी निर्माण होते आहे. निर्मळ मनानं, विधायक कृतीनं आणि आपुलकीच्या भावनेनं ही दरी सांधायला हवी आहे. परमपूजनीय श्री. गुरुजींच्या जन्मशताब्दीचं हे वर्ष 'समरसता वर्ष' म्हणून साजरं केलं जात आहे. ही समरसताच या समाजाला, या देशाला एकात्मभावानं उभं करणार आहे. हा 'एकात्म' भाव भारताचा अंगीभूत भाव आहे. पूजनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुढील उद्गार हे याची साक्ष आहेत. १९१६ साली कोलंबिया विश्वविद्यालयात सादर केलेल्या 'Caste in India' या प्रबंधाच्या सुरवातीलाच बाबासाहेब लिहितात, "मी आग्रहाने असे म्हणण्याचे धाडस करतो की, सांस्कृतिक एकरुपतेच्या बाबतीत भारतीय द्वीपकल्पाची बरोबरी जगातील कुठलाही देश करु शकणार नाही. तिथे भौगोलिक एकतेशिवाय अत्यंत खोल रुजलेली मूलभूत एकतापण आहे आणि त्याचा प्रभाव देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पसरलेला आहे". (संघर्ष महामानवाचा, पृ. ९७)

याच भूमिकेला अनुसरुन समरसतेचे भान जागं करणारी सुवचने प्रत्येक पृष्ठावरील तळटीपेत दिली आहेत.

**समाज हे परमेश्वराचे स्वरूप आहे.**

विशेष लेख

# कार्यसंस्कृतीचं चांगभलं

श्री. पु. ग. वैद्य

एकविसाव्या शतकामध्ये सेवाव्यवसाय हा अतिशय तेजीत राहणार आहे. १९९५ साली सेवाव्यवसायापासून मिळणारे उत्पन्न हे एकूण उत्पन्नाच्या ४८% एवढे होते. २००५ साली ते ५५% झाले आणि २०२० साली ते ७०% पर्यंत होईल. सेवाव्यवसाय हा कठोर परिश्रमांशी निगडीत आहे. आपल्या शिक्षणाला कठोर परिश्रमाची ॲलर्जी आहे. शालेय शिक्षणामध्ये मुख्य भर आहे तो ऐका, वाचा, घोका आणि ओका. शालेय शिक्षणामध्ये व उच्च शिक्षणामध्येही कर्मेंद्रियांचा वापर असणारे गृहपाठ सहसा असत नाहीत. दैनंदिन जीवनातीलही कामे करण्यासाठी यंत्र उपलब्ध झाल्यामुळे अनेकांना श्रमाची ओळखही झालेली नाही. नुसती नोकरी मिळवण्यासाठी नव्हे; तर व्यक्तिगत जीवन समृद्ध होण्यासाठी चांगले काम करणे हे अत्यावश्यक मूल्य आहे. तुम्ही किती शिकलात व काय शिकलात यापेक्षा तुम्ही दिलेले काम किती गुणवत्तेने करता याला महत्व आहे. पुण्यात 'श्री मिसळ' खाण्यासाठी रांगेत किमान अर्धा तास उभे रहावे लागते. यासारखी कितीतरी उदाहरणे देता येतील; पण असे गुणवत्ताधारी काम, ज्यातून कार्यसंस्कृती जोपासली जाईल, असे शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत कोठे ? २१ व्या शतकात 'हार्वर्ड' युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांपेक्षा हार्डवर्क युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांची गरज आहे. पण ही 'हार्डवर्क' युनिव्हर्सिटी आहे कोठे ?

कठोर परिश्रमांची सवय लागण्यासाठी व यातून कार्यसंस्कृती निर्माण होण्यासाठी याचे शिक्षण दैनंदिन व्यवहारातून व शाळांमधून द्यायला पाहिजे. काम करताना कर्मेंद्रियांचा वापर करावा लागतो. त्यातून नुसतेच काम होत नाही. कामाबरोबर आरोग्य चांगले राहते, मानसिकता सुधारते, सर्जनशीलतेची ओळख होते आणि कार्यसंस्कृती निर्माण होऊ लागते.

यासाठी शिक्षणसंस्थांनी आठवड्यातून कमीत कमी एकदा कर्मेंद्रियांवर आधारीत गृहपाठ दिला पाहिजे. ''उद्या आपला हातरुमाल धुऊन, व्यवस्थित घडी घालून शाळेत घेऊन या.'' '' किमान तुमच्या स्वत:च्या पांघरुणाची घडी घाला,'' एकदा शाळेमध्ये मी असा गृहपाठ दिल्यावर एका मुलाने हा गृहपाठ पूर्ण केला नाही असे सांगितले. त्याचे कारण मी त्याला विचारले, '' उठायला उशीर झाल्यामुळे मी पांघरुणाची घडी न घालता बाकीचे सगळे उद्योग उरकायला लागलो.'' असे त्या विद्यार्थ्याने उत्तर दिले. त्यावर मी विचारले की, '' पांघरुणाची घडी घालायला किती वेळ लागतो?'' त्यावर तो म्हणाला की, '' मी कधी वेळ लावून पांघरुणाची घडी घातलीच नाही. त्यामुळे मला माहीत नाही. हा सर्व संवाद हा 'सुखसंवाद' होता. कारण मुलाने गृहपाठ न केल्याबद्दल मी त्याला काही रागावलो नाही व शिक्षाही केली नाही. त्यानंतर मी वर्गातल्या सर्व मुलांना वेळेबद्दलचा हाच प्रश्न विचारला. पुन्हा एकजात सर्वांनी तेच उत्तर दिले. म्हणजे आम्ही वेळ लावून कधीही पाहिले नाही. त्यानंतर मी सर्व मुलांना स्वत:च्या पांघरुणाची घडी घालण्यासाठी किती वेळ लागेल याचा अंदाज करण्यास सांगून तो वहीत लिहिण्यास सांगितले. काही मुलांच्याकडून तो अंदाज

> प्राणीमात्रा सर्व निर्मीली । साधने ती दिली । परोपरी ॥ पदार्थ निर्मून सर्वांस पोशीले । आनंदित केले । सर्वकाळ ॥
> त्यापैकी मानव बुद्धीमान केला । सत्य वर्तायाला मासल्यांत ॥ रंजले गांजले अनाथा पोसावें । प्रितीनें वागावें । बंधुपरी ॥
> - (महात्मा ज्योतिबा फुले)

वाचून घेतला. मुलांशी बोलून सर्वात कमी असणारा अंदाज दोन मिनिटे होता. हाच गृहपाठ दुसऱ्या दिवसांसाठी दिला.

दुसऱ्या दिवशी मी वर्गात गेल्यावर मुले आपणहून पांघरुणाला घडी घालण्यासाठी लागणारा वेळ सांगत होती आणि स्वत:चा अंदाज किती चुकला याबद्दल स्वत:लाच हसत होती. सर्वांच्या अंदाजातील सर्वात जास्त वेळ २४ सेकंद होता आणि काल मुलांना सांगितलेल्या अंदाजातील सर्वात कमी वेळ २ मिनिटे म्हणजे १२० सेकंद होता. २४ सेकंद व १२० सेकंद यांच्या तुलनेवरुन अंदाज हा वस्तुस्थितीपासून कितीतरी दूर होता. अंदाज हा कधीच अचूक नसतो, पण तो वस्तुस्थितीच्या जवळपास असावा लागतो. असा अंदाज करता येणे हे एक कौशल्य आहे ते जीवनामध्ये अनेक वेळा वापरावे लागते. तसेच ते अभ्यासातही बरेच उपयोगी पडते. ती घडी नीटनेटकेपणाने व आनंदाने करणे हा कार्यसंस्कृतीचा भाग झाला. प्रत्येक कामातून कार्यसंस्कृती जोपासता येते. हे एक उदाहरण नमुन्यादाखल आहे. काही कामांतून तर कार्यसंस्कृती जोपासण्यास आवश्यक असणाऱ्या मूल्यांची जाण वाढते.

कोणतेही काम, कमी श्रमात, कमी वेळेत, कमी खर्चात, आनंदाने, उत्तम दर्जाचे, करण्याची मनोवृत्ती म्हणजे कार्यसंस्कृती कामातून मानसिकता वाढते हे साधारणपणे कुणाला पटत नाही. ज्या दिवशी तुमची आई काम करुन खूप दमली असेल, त्या दिवशी आपणहून आईचे पाय चेपा आणि पहा आईला किती आनंद होतो. ते त्याचबरोबर आईच्या आनंदामुळे तुम्हाला होणारा आनंद अनुभवा. या आनंदातून पुढे थकल्या भागलेल्यांना मदत करण्यातून आपल्याला आनंद होतो याची मूल्ये संबंधितांच्यात नकळत रुजतात. मानसिक मूल्यांची जाण म्हणजे काय याची कल्पना या उदाहरणातून येईल.

'स्व'-रुपवर्धिनी, 'ज्ञान प्रबोधिनी' यांसारख्या काही संस्थातून कार्यानुभवाची अनुभूती दिली जाते. त्यातून विद्यार्थ्यांना कर्मेंद्रियांचा वापर करण्याची संधी मिळते ही अभिनंदनीय गोष्ट आहे. या संस्काराची लागण सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये होवो ही सदिच्छा !

**'कार्यसंस्कृतीचे चांगभलं ! '**

*(श्री. पु. ग. वैद्य यांची प्रयोगशील ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ म्हणून ख्याती आहे. 'स्व'-रूपवर्धिनीच्या स्थापनेपासून या कामाशी त्यांचा निकटचा संबंध असून वर्धिनीत चालणाऱ्या विविध अनौपचारिक शैक्षणिक उपक्रमांना त्यांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत आलेले आहे.)*

*With Best Compliments From :*

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

Plot No. 4, S. No. 17/1 – B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune - 411 038
Phone : 25431474, 25441124, 25464551

'दया धरम का मूल है, नरक मूल अभिमान'

- (राजर्षि शाहू महाराज)

# माहिती तंत्रज्ञानाचा झंझावात

✍ श्री. पु. व. श्रॉफ

'स्व'-रूपवर्धिनी म्हणजे विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा सर्वकष विकास. बौद्धीक विकासाचे महत्व अनन्यसाधारण आहे. म्हणून कै. किशाभाऊंनी आणि आम्ही सुरवातीच्या आठ-दहा सवंगड्यांनी ही संस्था पुण्याच्या पूर्व भागात सुरु केली. वर्धिनीतील मुलांना संगणकाची व विविध सर्च इंजिन्सची माहिती या लेखात सोप्या शब्दांमध्ये देण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वच क्षेत्रात, विशेषत: संगणक क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. हे बदल अंगिकारणे क्लेशकारक असते. बदल हा नेहमीच क्लेशकारक असतो, परंतु बदलाकडे 'क्लेशा'ऐवजी आव्हान असे पाहिले, तर तरुण पिढीचे जीवन उज्ज्वल होईल.

नुकतेच माझ्या वाचनांत थॉमस एल. फ्रिडमन यांचे 'द वर्ल्ड इज फ्लॅट' हे पुस्तक आले. पृथ्वी गोल आहे ही गोष्ट वादातीत आहे, परंतु फ्रिडमन यांच्या मते जग हे गोल नसून सपाट आहे, याचे कारण आज जगातील सर्व बौद्धिक दळणवळण दिवसेंदिवस सुलभ होत आहे. आता संपूर्ण जगाचे एकच नेटवर्क (इंटरनेट) अस्तित्वात आले आहे. जग दळणवळणाच्या सुलभतेमुळे एक लहान खेडे झाले आहे. देशाच्या सीमा पुसल्या जात आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यापारांत प्रचंड वाढ होत आहे व प्रतिभावान शास्त्रज्ञांच्या कल्पनेतून शोधांचे स्त्रोत वेगाने वाढत आहेत. त्यामुळे समृद्धी तर आली आहेच, परंतु या समृद्धीपासून वंचित असे वर्ग मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहे. ही विषमता कशी नाहीशी करावयाची, हे आव्हान याच विकसित देशांना पेलवायचे आहे.

माहिती दळणवळण क्षेत्रातील खालील तीन महत्वपूर्ण शोधांमुळे भौगोलिक सीमा भेदून जग एकत्र येण्यास मोलाची मदत झाली आहे.

- तारायंत्राचा शोध
- वर्ल्ड वाइड वेब (W.W.W) चा शोध लागल्यामुळे मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना जगभर व्यापार करणे सुलभ झाले.
- १९९५ साली माऊंट इनव्ह्यू कॅलिफोर्निया येथे असलेल्या नेटोकेप या कंपनीने लावलेल्या शोधामुळे झाली. पूर्वी आयबीएम, ॲपल, सन, युनिक्स वगैरे अनेक वेगवेगळ्या आज्ञावल्या होत्या. एका प्रकारच्या कॉम्प्युटरमधून दुसऱ्या कंपनीच्या कॉम्प्युटरशी संपर्क होत नसे. हा अडसर नेटोकेपेने ब्राउजर चा शोध लावून दूर केला. या शोधामुळे एकमेकांशी संपर्क सोपा झाला. अशाप्रकारे ग्लोबलायझेशनच्या प्रथम अवस्थेत देश, दुसऱ्या अवस्थेत बहुराष्ट्रीय कंपन्या व तिसऱ्या अवस्थेत व्यक्ती-व्यक्तींमधील संपर्क प्रस्थापित झाले.

  या खेरीज या क्षेत्रातील दहा महत्वाच्या शोधांची व घटनांची माहिती पुढे दिली आहे.
- **द न्यू एज ऑफ क्रिएटिव्हीटी** - पर्सनल कॉम्प्युटरमुळे प्रत्येक नागरिकाला वेबमध्ये मुक्त प्रवेश मिळाला त्यामुळे ज्ञान व माहितीचे आदानप्रदान प्रचंड प्रमाणात वाढले.
- इंटरनेटच्या उदयामुळे दळणवळण खूपच स्वस्त झाले व सामन्यांच्या आवाक्यांत झाले. इंटरनेट म्हणजे नेटवर्कचे नेटवर्क. इंटरनेटच्या संशोधकांनी या सॉफ्टवेअरचा वापर सर्वांना विनामूल्य करण्याची मुभा दिली. ह्या ज्ञानदानाचे करावे तितके कौतुक थोडेच आहे. त्यामुळे इंटरनेटचा वापर सर्रास सुरु झाला. म्हणूनच फ्रिडमन यांनी त्याला वर्ल्ड वाईड वेब असे नाव दिले. हे W.W.W. बेनर्स ली या संशोधकांची करामत आहे. त्याने एच.टी.एम.एल.

**''माझ्या जीवन तत्वज्ञानात बंधुतेला फारच उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य आणि समतेची हमी कायदा नसून बंधुता आहे. बंधुतेचेच दुसरे नाव धर्म आहे''. - (डॉ. बाबासाहेब आंबेडकर)**

ही अत्यंत सोपी कोडींग पद्धत निर्माण केली. वेबमध्ये पाने कशी करावीत, वेबला पत्ता कसा द्यावा, आपल्या कॉम्प्युटरवर कोणी हल्ला केल्यास तो कसा थांबवावा, हे सर्व नेटस्केप च्या मदतीने १९९१ साली शक्य झाले आणि नेटचा एखाद्या साथीप्रमाणे प्रचंड वेगाने प्रसार झाला पाच वर्षांमध्ये वेब वापरणाऱ्यांची संख्या लाख लोकांपासून ४ कोटी लोकांपर्यंत पोचली. या वाढत्या पसाऱ्याला सामोरे जाण्यासाठी नेटस्केप ही कंपनी पब्लिक लिमिटेड झाली. मानवजातीच्या दृष्टीने हा दिवस म्हणजे क्रांती दिन आहे. असे फ्रिडमन यांना वाटते. नेटस्केप कंपनीने हे ब्रॉउजिंग जगाला विनामूल्य दिले आणि तद्‌अनुषांगिक सर्व सॉफ्टवेअर प्रॉडक्टस मुक्ततेने वापरण्याची परवानगी दिली. त्यामुळेच संशोधन सुलभ झाले.

* **वर्क फ्लो सॉफ्टवेअर** - या तंत्रज्ञानामुळे एक्स्टेंडेबल मार्कअप लँग्वेज आणि त्यांच्याशी संबंधित ट्रान्स्पोर्ट प्रोटोकॉल (सिंपल ऑब्जेक्टीव ॲसेस प्रोटोसेल - SOAP) याचा व्यावहारिक उपयोग सुरु झाला. याच बरोबर एच.टी.एम.ल., एच.टी.टी.पी., टी.सी.पी./आय.पी. आणि एक्स.एम.एल. ही स्टॅन्डर्डस् स्वीकारली गेली. त्यामुळे विचार विनिमयाची सुलभता व दळणवळण इतके वाढले की विविध सॉफ्टवेअर कंपन्यांनी परस्परांशी होणारी आपसातील स्पर्धा थांबवली व सॉफ्टवेअर म्हणजे कच्च्या मालासारखे झाले व शास्त्रज्ञ त्यावर व्हॅल्यू ॲडेड सेवांच्या निर्मितीचा प्रयत्न करु लागले. कंपनी चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक सुविधा व्हॅल्यू ॲडेड या सॉफ्टवेअर मुळे सोप्या व शक्य झाल्या. हेन्री फोर्ड यांच्यामुळे उत्पादकतेसाठी वर्क फ्लो प्लॅटफॉर्म निर्माण झाला. त्याप्रमाणे वरील संशोधन व प्रोटोकॉल्समुळे व्यवस्थापन सुसूत्र झाले.
* **अपलोडींग** म्हणजे समाजातील बुद्धीवंतांच्या बुद्धीचा योग्य वापर. त्या सॉफ्टवेअर मध्ये आपण केलेली सुधारणा तो सायबर बोर्ड वर नोंदवतो. तज्ज्ञ लोक त्याचे परीक्षण करतात व सूचना योग्य असल्यास त्याचा समावेश सॉफ्टवेअरच्या प्रगतीसाठी केला जातो. यातूनच ई -बी-मार्केट प्लेस, ई-कॉमर्स, आयपॉड, सीटूसी अशासारख्या शेकडो संकल्पना उदयाला आल्या.
* **आउटसोर्सिंग** - आउटसोर्सिंग डॉटकॉमचा फुगा फुटला. २००० सालापर्यंत '५२ के' चे प्रोग्रॅम सुधारण्याचे काम अमेरिकेने बंगलोर, हैद्राबाद व पुणे येथील कॉम्प्युटर कंपन्यांना दिले होते. तेही संपले. परंतु डॉटकॉमच्या लोभापायी कोट्यावधी डॉलर्सची गुंतवणूक केलेल्या कंपन्या दिवाळखोरीत निघाल्या. या कंपन्यांनी जगभर फायबर ऑप्टीक्सचे जाळे निर्माण केले होते. बँकांनी १०% पेक्षा कमी किंमतीत हे सर्व विकत घेतले. त्यामुळे कमी किंमतीच्या फायबर ऑप्टीक्समधून मोठ्या प्रमाणात माहितीचे आदान-प्रदान फारच स्वस्तात सुरु झाले. त्यामुळेच आज बंगलोर, हैद्राबादची, पुण्याची भरभराट झालेले दिसत आहे. भूगोलाचे अंतर आता नगण्य झाले आहे. कधी कधी चुकीच्या गुंतवणुकीतून सुद्धा क्रांती कशी सुरु होते याचे हे उत्तम उदाहरण आहे. डॉटकॉमचा फुगा फुटला परंतु जागतिकीकरणाची प्रक्रिया थांबली नाही. उलट स्वस्त केबल नेटवर्क उपलब्ध झाल्यामुळे दळणवळण प्रचंड वेगाने वाढले.

या अवस्थेत दळणवळणाची साधने वाढल्याने फक्त माहितीचे आदान-प्रदान परदेशांत गेले नाही तर व्यापाराच्या पद्धतीत सुद्धा बदल झाला.

**" सर्व माणसे सारखी आहेत. सर्वांच्या रक्ताचा रंग लाल आहे. सर्वांना बत्तीस दात आहेत. सर्वांचा जन्म आईच्या उदरातूनच होतो. मग भेदाभेद कसला ?"** - (संत गाडगेबाबा)

चीनमध्ये ग्राहकयोग्य माल, जपानमध्ये हार्डवेअर व मोटारी तर सेउलमध्ये फ्रिझ, ए. सी., मशिन्स, मोठी जहाजे इत्यादीची रेलचेल आहे. तेथून त्या वस्तू घेऊन प्रगत देशांना विकणे हा मोठा उद्योग झाला आहे. प्रगत देशांच्या आजवरच्या अग्रस्थानाला पुढील काळात धक्का बसणारच नाही असे नाही.

- **वॉलमार्ट** - बेनटोन नावाच्या खेड्यामध्ये वॉलमार्ट हे दुकान प्रथम सुरु झाले. पूर्ण वर्षभर आणि दररोज चोवीसही तास कंपनीच्या गोदामात माल भरला जातो. माल भरण्यासाठी ट्रकसच्या मैलोनमैल लांब रांगा असतात. माल भरणे, इच्छित स्थळी पोहोचवणे, मालाचे वर्गीकरण, पॅकींग, पुरवठा व प्रत्यक्ष गिऱ्हाईकाला माल पोहोचविणे या सर्व प्रक्रिया यांत्रिक पद्धतीने होतात. दररोज साधारण २३०० कोटी कार्टन्सचे वितरण होते. यासाठी वॉलमार्टचे स्वतःचे सॉफ्टवेअर आहे व त्यासाठी स्वतःचा उपग्रहही आहे. हा उपग्रह अमेरिकन संरक्षण खात्याच्या उपग्रहापेक्षाही कितीतरी अधिक क्षमतेचा आहे. वॉलमार्टने पुढील तीन बाबींकडे आपले लक्ष केंद्रीत केले.

- पहिली बाब म्हणजे उत्पादकांशी योग्य संधान साधून त्यांचा उत्पादन खर्च कमी केला.
- दुसरी बाब म्हणजे जिथे जे स्वस्त मिळेल ते विकत घेतले.
- तिसरी बाब म्हणजे आपल्या व्यवसायात सातत्याने सुधारणा केल्या. 'रोज स्वस्त व अधिक चांगले' हे त्याचे घोषवाक्य आहे. वॉलमार्ट यशस्वी होण्यामागेवस्तू कोणत्या कार्टनमध्ये व कोठे आहे हे अचूक सांगणारे आर.एफ.आय.डी. टॅग हे तंत्रज्ञान आहे.

- **इनसोर्सिंग** - युनायटेड पार्सल सर्व्हिस आणि फेडेक्स या दोन अमेरिकेच्या कुरिअर सर्व्हिसेस लहान पाकीटापासून मोठ्या ट्रकपर्यंत कुठलाही माल, निरोप आल्यावर जागेवर येऊन गोळा करतात आणि कमीत कमी वेळांत इच्छित स्थळी पोचवतात. आता इंटरनेट आले त्यामुळे खर्चात प्रचंड बचत झाली. युपीएसने डिलीव्हरी इन्फॉमेशन एक्युझेशन डीव्हायसेस ही यंत्रणा विकसीत केली आहे. त्यामुळे चुकीच्या डिलीव्हरीची शक्यताच नाहीशी झाली आहे. त्यांना आता व्हॅल्यू ॲडेड सर्व्हिसेस सुरु केल्या आहेत. उदा. जपानमधील कंपन्यांनी बनवलेली वैद्यकीय उपकरणे अमेरिकेतील डॉक्टर्स वापरतात. त्यात काही अडचण आल्यास किंवा बिघाड झाल्यास युपीएस ने आपल्याच जागेमध्ये दुरुस्तीची यंत्रणा उभी केली आहे. यामुळे दुरुस्तीसाठी लागणारा वेळ १५ दिवसांपासून ४ दिवसांवर आला. खर्चातही बचत झाली.

- **इन्फॉर्मिंग** - म्हणजे गुगल, याहू, एम.एस.एन., वेब सर्च पुन्हा एकदा माउंटनव्ह्यू, कॅलिफोर्निया नेटस्केप या कंपनीने जागतिक क्रांती केली. गुगल याचा अर्थ एक या आकड्यापुढे शंभर शून्ये दिल्यानंतर होणारा आकडा. जगातील प्रत्येकाला हव्या त्या भाषेत, हवी ती माहिती आणि ज्ञान उपलब्ध करुन द्यावयाचे हे गुगल चे उद्दिष्ट आहे. आज गुगलमध्ये १०० भाषांमध्ये माहिती मिळते.

इन्फॉमेशन म्हणजे आपण स्वतःच ज्ञान मिळवणे. आपण घरात बसून आपल्या कॉम्प्युटरवर या सर्व गोष्टी करु शकतो. गुगलकडे सध्या रोज एक अब्जापेक्षा अधिक व्यक्ती माहिती विचारत आहे. गुगल हे सोपे आणि अधिक अचूक सर्च इंजिन आहे. हे लोकांच्या लक्षात येताच गुगलचा ग्राहक वर्ग वाढला. निम्म्यापेक्षा कमी ग्राहक इंग्रजीमध्ये

**'तो तसा मी' या भावनेने दुसऱ्याशी समरस होणे म्हणजे समरसता.** - (डॉ. हेडगेवार)

विचारणा करतात. दिवसेंदिवस ग्राहकांकडून असंख्य, अतर्क्य आणि विविध विषयांवर माहितीची विचारणा होत असते. गुगलसाठी काम करणारे तज्ज्ञ, बुद्धिमान संशोधक ही सर्व माहिती विनामूल्य पुरवीत असतात. गुगलने मिशिगन व स्टॅनफोर्ड येथील युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीत असणाऱ्या लक्षावधी ग्रंथांना आपल्या सर्च इंजिन मध्ये सामील करुन घेतले. त्यामुळेच हे सर्व ज्ञानभंडार ग्राहकांना उपलब्ध होऊ शकले.

* **डीजिटल मोबाईल-** पर्सनल व्हिजुअल अर्थात मोबाईल फोन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या अद्ययावत हार्डवेअरचा सर्वात जास्त वापर जपानमध्ये होतो. वायरलेस टेक्नालॉजीमुळे दिवसेंदिवस माहिती आणि माहितीचे विश्लेषण अत्यंत वेगवान होत आहे.

खालील सहा संशोधने या प्रगतीसाठी उपयुक्त ठरली आहेत.

- **कॉम्प्युटींग** - कॉम्प्युटेशनल कॅपॅबिलीटी, स्टोअरेज कॅपॅबिलीटी, इनपूट आणि आउटपूट कॅपॅबीलीटी या तीन प्रकारांच्या प्रचंड वेगामुळेच माहितीची देवाण-घेवाण शक्य झाली आहे.
- **एम.आय.पी.एस.** म्हणजे मिलीअन ऑफ इन्स्ट्रक्शन्स पर सेकंद हे एक मायक्रो चीपच्या क्षमतेचे मोजमाप आहे. आज इन्टेल पेन्टीअम प्रोसेसरच्या एक्सट्रीम एडीशनमध्ये २० बिलियन इन्स्ट्रक्शन प्रत्येक सेकंदाला दिल्या व घेतल्या जातात.
- तात्काळ निरोप देण्यामध्ये झालेली क्रांती आणि फाईल शेअरींगमुळे २००५ साली पाच बिलीयन लोकांनी याचा लाभ घेतला.
- **प्रायव्हेट कॉल** (व्ही.ओ.आय.पी.) म्हणजेच व्हाइस ओव्हर इन्टर्नल प्रोटोकॉल सर्व्हिस आज मोबाईल फोन म्हणजे काय, त्याची उपयुक्तता, तो वापरणाऱ्यांची वाढणारी संख्या याबद्दल लिहिण्याची गरज नाही. ते सर्वांना माहित आहेच.
- **व्हीडीओ कॉन्फरन्सिंग** - बंगलोर येथे इन्फोसिस कंपनीमध्ये ४०' X ४०' असा भिंतीला बसवलेला पडदा आहे. त्यासमोर स्टेजवर चर्चा करावयास आलेले लोक बसतात आणि सिलीकॉन व्हॅलीतील व्यक्तींशी जणू काही ते एकाच खोलीत बसले आहेत अशा पद्धतीने एकमेकांशी बोलतात व प्रवास केल्याशिवाय एकमेकांशी हस्तांदोलन करु शकतात.
- **कॉम्प्युटर ग्राफिक्स**
- **वायरलेस टेक्नालॉजी** - दर पंधरा महिन्यांनी ज्ञान, मग ते कुठल्याही शाखेचे असो, ते दुपटीने वाढणार आहे. कॉम्प्युटर चीप दुपटीने समर्थ होणार आहे पण चीप त्याच राहणार आहेत. बौद्धिक स्वामित्वाचा प्रभाव प्रचंड प्रमाणात वाढणार आहे. तर मग आता तुम्हीच ठरवा. तुम्हाला या बौद्धिक दंगलीमध्ये भाग घ्यावयाचा आहे का आहे त्याच वातावरणात सुस्तपणे रममाण व्हावयाचे आहे. प्रगत जग व मागासलेले देश यांची विभागणी आता भौगोलिक राहिली नसून व्यक्ति-व्यक्तिच्या बौद्धिक कुवतीवर अवलंबून आहे.

*(श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ हे वर्धिनीचे संस्थापक अध्यक्ष. सध्या कार्याध्यक्ष या पदाची जबाबदारी सांभाळत आहेत. वयाच्या ८२व्या वर्षीही त्यांचा उत्साह, स्वत:च्या उद्योग व्यवसायातील कार्यमग्नता तरुणांना लाजवणारी आहे. सतत नवीन नवीन पुस्तकांचा अभ्यास हे त्यांचे आणखीन एक वैशिष्ट्य.)*

**" प्रभुरामचंद्राने भारताच्या उत्तर आणि दक्षिण दिशा एक केल्या तर भगवान श्रीकृष्णाने पूर्व व पश्चिम यांच्यांत सांगड घातली. सारांश भारतीय जनजीवन हिंदू भावविश्वाशी जणू रेशमी धाग्यांनी बांधलेले आहे."** - (डॉ. राममनोहर लोहिया)

वार्षिक कार्यक्रम वृत्त

# संक्रांत उत्सव

## बालवाडी व बालशाखा विभाग



गुरुवार दिनांक १९ जानेवारी रोजी कार्यक्रम झाला. 'किशोर' या बालांसाठी चालविल्या जाणाऱ्या सुप्रसिद्ध मासिकाच्या संपादिका सौ. ज्ञानदा नाईक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. ''स्वच्छतेतून समृद्धीकडे'' हा संदेश परिणामकारकरित्या पोहोचविणाऱ्या नाटिकेचे सादरीकरण हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते. आपल्या घराजवळील, वस्तीतील स्वच्छता याकडे प्रत्येक नागरिकाचे लक्ष असले पाहिजे हे या नाटिकेतून मांडले होते. अध्यक्षस्थानावरुन बोलताना सौ. नाईक यांनी 'प्रत्येक माणसात गुण हे असतातच. आपले गुण ओळखता यायला हवेत व या गुणांच्या आधारेच आपण आपली योग्य ओळख करुन देऊ शकतो. केवळ दुसऱ्याची नक्कल करुन त्याच्यासारखे यश मिळवायचे ठरवले तर फजितीसुद्धा नशिबी कशी येते' यासंबंधीची एका गाढवाची गोष्ट त्यांनी मुलांना सांगून, हसवत हसवत 'शहाणे' केले.

## शाखा व प्रकल्प विभाग

रविवार दिनांक २२ जानेवारी रोजी रमणबाग शाळेमध्ये कार्यक्रम संपन्न झाला. मे. दीपक नायट्रेट या कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. बद्रीनाथ मूर्ती हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. रंगमंचीय अविष्काराच्या माध्यमातून सर्व विभागांनी आपली प्रात्याक्षिके सादर केली. यामध्ये कीर्तन, अभंग गायन, भारुड, पोवाडा, जाग्रण-गोंधळ, मूकनाट्य, गणेश वंदना नृत्य, दीपनृत्य, ओळख विश्वकर्मांच्या मुलांची अशी विविध प्रात्याक्षिके सादर झाली.




कार्यक्रमाच्या निमित्ताने कार्यवृत्त-२००५ या कार्यवृत्ताचे प्रकाशन संस्थेचे सन्माननीय सभासद श्री. प्रमोद चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. बद्रीनाथ मूर्ती यांनी याप्रसंगी ''यशस्वी होण्यासाठी आपले गंतव्यस्थान निश्चित माहिती हवे, तेथपर्यंत पोहोचण्यासाठी गतीही हवी व दिशेचेही भान असायला हवे'' हा महत्वाचा विचार सर्वांसमोर मांडला.

❖❖❖

**'' भारत माते आम्हाला शिवाची मती दे, कृष्णाचे अंत:करण दे, रामाची कृती दे. अपरिमित मन देऊन आमची घडण कर. उन्मेषशाली हृदय दे पण जीवन मात्र संयमी कर.''** - (डॉ. राममनोहर लोहिया)

# तुझे आहे तुजपाशी..

(वर्षारंभ उपासना कार्यक्रमाला रा.स्व.संघाचे सरकार्यवाह डॉ. मोहनजी भागवत उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी खालील विचार व्यक्त केले.)



वर्षप्रतिपदेचा दिवस हा विचार करुन संकल्प करण्याचा दिवस. विचार कसा करतो, हे विचार करण्यापेक्षा महत्वाचे. विचारांची दिशा कोणती आहे हे महत्वाचे. केवळ 'पैसा व करिअर' यांच्या मागे लागणे हा जीवनाचा उद्देश होऊ शकत नाही. या जगात पैशाने प्रेम आणि समाधान मिळवता येत नाही.

आपल्या 'स्व'रुपाचा बोध होणे हे सर्वात महत्वाचे आहे. 'तुझे आहे तुजपाशी' हे समजणे महत्वाचे आहे. 'सो ऽ हं' हे कळणे म्हणजेच 'स्व'रुपाचा बोध होणे. असा विचार फक्त मनुष्यच करु शकतो. पशू हा विचार करु शकत नाही. 'जन्माला आला म्हणून जगला' असे जगणे हे पशुवत जगणे. धर्मानुसार आचरण करणे व तसे जगणे हे मनुष्यत्वाचे लक्षण आहे.

लहान बाळाला आधी फक्त आईचीच ओळख असते. हळूहळू अन्य नातेवाईकांची ओळख होते. हा परीघ वाढत वाढत सर्व जग आपले होते. आपणच या जगाचा विचार केला पाहिजे. पण फक्त स्वत:चा विचार करण्यात आणि 'करिअरिस्ट' होण्याच्या नादात मुले घरापासून, घरच्यांपासून दूर जातात. वृद्ध पालक कुढत गावात एकटेपणाने रहातात. गुजराथ, पंजाबमध्ये फिरत असताना फक्त म्हाताऱ्यांचीच वस्ती असलेली गावे दिसून येतात. अर्थात घरातले, आजूबाजूचे लोक तरुण मुलांना हिताचा सल्ला म्हणून कधी कधी चुकीचा, स्वार्थाचा सल्ला देतात. गडकऱ्यांच्या मूकनायक नाटकातील नायकासारखं 'मूकनायक' बनून सर्वसामान्यांनी कुणाच्या 'अध्यात नाही-मध्यात नाही' असे जगावे अशी या सर्वांची इच्छा असते. काश्मिरी पंडीतही गृहस्थ म्हणून उत्तम जगले; पण समाजाला विसरले आणि आजची विपरीत अवस्था त्यांच्या वाट्याला आली.


मात्र समाजापुढे आदर्श असतात ते स्वामी विवेकानंदांसारख्या महापुरुषांचे, ज्यांच्याकडे लौकिक अर्थाने पैसा नाही वा कोणते अधिकाराचे पद नाही. घरातील आईही घरातले सर्व जेवले की स्वत: काही न खाता तृप्त होते. अशा रितीने इतरांकरिता जगणे महत्वाचे. मात्र यात कोणताही दांभिकपणा नसावा.

स्वत:ला नीट ठेवणे, आपल्या कुटुंबाला नीट ठेवणे व समाजाला नीट ठेवणे ही तीन कामे प्रत्येकाने केलीच पाहिजेत. आपण समाजाची सेवा करण्याचे व्रत स्वीकारले आहे. त्याकरिता कष्ट केले पाहिजेत. आपण 'स्व'-रुपवर्धिनीचे कार्यकर्ते आहोत हे लक्षात घेऊन हा सेवा-व्रताचा संकल्प आम्ही विसरु नये. माझ्यापासून परब्रह्मापर्यंत मीच आहे. या 'मी'ला ओळखणे हा 'स्व'-रुपाचा परिचय. म्हणून ''स्वार्थी 'स्व'चा विचार करा.'' या इतरांच्या सल्याच्या भ्रमात न पडता 'जगाचा' विचार करणे हे महत्वाचे. नव्या वर्षाच्या प्रारंभी हा विचार करणे, संकल्प करणे महत्वाचे आहे.

❖❖❖

आपण सर्व भारतमातेची लेकरे आहोत म्हणून परस्पर बंधू-भगिनी आहोत.

*स्वातंत्र्यदिन कार्यक्रम* - 'स्व'-रुपवर्धिनीच्या इमारतीवर सकाळी ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. संध्याकाळी बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. फुटबॉल सर्वच खेळांचे सामने त्याचवेळी पडणाऱ्या भुरभुर पावसाने आणखीनच रंगतदार झाले.



या वर्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी "भारताची खरी ओळख" या पुस्तकाचे लेखक श्री विश्वासराव देशमुख हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी असे सांगितले की, परमेश्वराने आपल्या प्रत्येकाला काही विशेष शक्ती दिली आहे. त्या शक्तीची ओळख प्रत्येकाने करुन घ्यावी. त्याच्या बळावरच आले व्यक्तिमत्व फुलणार आहे. 'स्व'-रुपवर्धिनीचे कार्य हेच आहे. येथे येणाऱ्या विद्यार्थ्याने आपल्या रुपाची ओळख करुन घ्यावी व त्याचा विकास करावा.

या निमित्ताने सर्व शाखांसाठी एक प्रकल्प स्पर्धा घेण्यात आली. शाखेने ज्या श्रेष्ठ व्यक्तीचे नाव धारण केले आहे त्यांचं चरित्र प्रकल्प स्वरुपात मांडणे असे या स्पर्धेचे स्वरुप होते. भगिनी निवेदिता शाखेला प्रथम क्रमांकाचे तर स्वामी श्रद्धानंद शाखेला द्वितीय क्रमांकाचे बक्षिस देण्यात आले.

---

### *डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम*



डॉ. आंबेडकर जयंती निमित्त वर्धिनीच्या वतीने 'आनंद' पाणपोई चालवली जाते. या वर्षी या पाणपोईच्या उद्‌घाटनासाठी पुणे विद्यापीठातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. एस. गायकवाड हे उपस्थित होते.

या प्रसंगी त्यांनी डॉ. बाबासाहेबांना कराव्या लागलेल्या संघर्षाच्या घटना सांगत, या प्रत्येक संघर्षाच्या प्रसंगी बाबासाहेबांचे विचार काय होते हे सांगितले. जातीयतेमुळे दलित समाजाला ज्या प्रकारचे जीवन जगावे लागत होते, त्यातून त्यांची मुक्तता करतानाही बाबासाहेबांनी राष्ट्रहिताला, देशाच्या संस्कृतीच्या हिताला कसे प्राधान्य दिले हे त्यांनी विस्तृतपणे सांगितले.

याच दिवशी संध्याकाळी रक्तदान शिबिर संपन्न झाले. जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात ६५ पिशव्या रक्त संकलित झाले.

### *थेंब एक रक्ताचा........*

आजही अनेक घरांमध्ये नवस फेडण्याच्या प्रसंगी देवाला कोंबडं बळी दिला जातो. वर्धिनीचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.सुनील कुलकर्णी यांच्या वृध्द आईच्या सेवेसाठी नेमलेल्या एका गृहपारिचारिकेच्या घरी अशा प्रकारची प्रथा होती. एप्रिलमध्ये त्यांच्या घरी असा एक नवस फेडण्याचा कार्यक्रम होता. श्री. सुनील कुलकर्णी यांनी त्या गृहपारिचारिकेला समजावून सांगितले की बळी देऊन कोंबड्याचे रक्त वाया घालवण्यापेक्षा तुम्ही स्वत: रक्तदान करुन एका गरजूचा जीव वाचवा. त्या गृहपरिचारिकेला हे म्हणणे पटले. वर्धिनीच्या रक्तदान कार्यक्रमाला त्या आल्या व त्यांनी स्वत: रक्तदान करुन एका अनिष्ट प्रथेला, स्तुत्य कृतीने स्वत:च्या घरातून हद्दपार केले.

**आपल्या सर्वांचे एक सामाजिक मन होऊ द्या ! आपल्या सर्वांचे एक राष्ट्रीय उद्दिष्ट असू द्या !**
**एकात्म, निर्दोष, समृद्ध आणि समर्थ भारताचे स्वप्न एकच असू द्या !**


# गणेशोत्सव

*विविध उपक्रम*

- स्वामी योगानंद शाखेने झांज लेझीम यांची जुगलबंदी व 'प्लास्टिक' वापरासंबंधी जनजागृती या विषयावर पथनाट्य बसवून परिसरातील सहा गणेश मंडळांसमोर कार्यक्रम सादर केला.
- स्वामी श्रद्धानंद शाखेने 'घुंगूरकाठी' या नृत्यप्रकारामध्ये 'शिवचरित्र' बसवून त्याचे वेगवेगळ्या मंडळांसमोर सादरीकरण केले.
- रामकृष्ण शाखेच्या विद्यार्थ्यांनी झांज पथकाचे सादरीकरण केले.
- गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा 'पूजा प्रशिक्षण वर्गाचे' आयोजन याही वर्षी करण्यात आले. पंचवीस नागरिकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

*विशेष प्रसंग –*

- गोखले स्मारक चौक गणेशोत्सव मंडळ संयोजित राज्यस्तरीय ढोल ताशा स्पर्धेमध्ये स्वरुपवर्धिनीच्या स्वामी श्रद्धानंद शाखेच्या घुंगुरकाठी पथकाला शालेय गटात 'द्वितीय' क्रमांकाचे रु. १०,०००/-चे रोख पारितोषिक व मानचिन्ह मिळाले.



- वर्धिनीचे ९० जणांचे पथक अशोकनगर मित्रमंडळ, सायन, मुंबई येथे गेले होते. वर्धिनीच्या पथकांचे कौशल्य पाहण्यासाठी तेथील स्थानिक लोकांनी गर्दी केली होती. मुंबई येथील सुप्रसिद्ध 'लालबागचा राजा' या मंडळाचे कार्यकर्ते मिरवणुकी दरम्यान कार्यकर्त्यांना भेटले व विसर्जन मिरवणुकीसाठी पथक मिळावे असे आग्रहाचे निमंत्रण दिले.
- पथकांमधील शिवचरित्र, शिवराज्यभिषेक, दहिहंडी, ज्ञानेश्वर -चांगदेवभेट, भारतमाता, नरसिंह अवतार, महिषासूरमर्दिनी असे वेगवेगळे ऐतिहासिक व पौराणिक प्रसंग लोकांना विशेष करुन आवडले. लोकांनी चौकाचौकांमध्ये उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला व मुलांचे कौतुक केले.
- अजय शिंदे हा अखंडानंद शाखेचा वर्धक. याच वर्षी शाखेत आला आहे व पहिल्यांदाच पथकात खेळला. परंतु शाखेतील त्याच्या रोजच्या सरावामुळे त्याच्या शाळेने पथक प्रमुख म्हणून शाळेच्या पथकाची जबाबदारी त्याच्यावर सोपवली.
- अभेदानंद शाखेने अथर्वशीर्ष पाठांतराचा उपक्रम घेतला. शाखेतील दोन वर्धक शाळेतील अथर्वशीर्ष पाठांतर स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांकाने विजयी झाले.
- श्री गणेशमूर्ती प्रतिष्ठापना व अनंतचतुर्दशीच्या दिवशी वर्धिनीची पथके वेगवेगळ्या मंडळासमोर सादर झाली. वर्धिनीच्या शाखांपैकी पाच शाखांनी झांज, तीन शाखांनी टिपरी, दोन शाखांनी ध्वजदल, उर्वरीत दोन शाखांपैकी एका शाखेने घुंगुरकाठी पथक बसविले होते. युवक व युवतींची ध्वजदल पथके मिळून यावर्षी एकूण तेरा पथके बसविली होती. मिरवणूकीत यावर्षी वर्धिनीच्या एकूण ६०० विद्यार्थी व युवक, युवतींनी सहभाग घेतला होता.

"समरसता माणसांना जोडते, समाजाच्या उन्नतीसाठी खांद्याला खांदा लावून 'भवतु सब्ब मंगलम्' म्हणत गतिमान होत असते.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

७ ऑक्टोबर २००६ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. उपाध्यक्ष श्री. उदय गुजर हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

कार्यकारिणी सदस्य श्री. पराग लकडे यांनी गेल्या वर्षभरात झालेल्या कामाचा वृतांत उपस्थितांसमोर मांडला. तर सहकार्यवाह श्री. अविनाश जोशी यांनी आर्थिक वर्ष २००५-०६ चा ताळेबंद मांडला. उपस्थितांनी या ताळेबंदाला मान्यता दिली. ८०जीच्या मान्यतेसाठी आयकर खात्याने सुचविलेल्या काही तरतुदींच्या अभ्यास करुन त्यांचा विद्यमान घटनेत समावेश करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेने यावेळी ठरावाद्वारे कार्यकारिणीला दिला.

कार्याध्यक्ष श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी चऱ्होली बुद्रुक येथील जमीन खरेदी व्यवहारातील प्रगतीची माहिती सभेसमोर ठेवली. तसेच या जागेवर कोणकोणते उपक्रम सुरु करण्याचा मनोदय आहे याची कल्पना दिली. उपाध्यक्ष श्री. गुजर यांनी 'स्व'-रुपवर्धिनीच्या कामाला सक्रीय सहाय्य करणाऱ्या गंगायमुना धर्मादाय न्यासाशी वर्धिनीचे नाते अधिक दृढ कसे करता येईल याविषयी विचार मांडले.

संस्थेचे एक सभासद श्री. नारायण चांडक यांनी अन्य सामाजिक संस्थांशी सहकार्य करण्याच्या संदर्भात काही सूचना केल्या.

## क्षण आनंदाचे ....

- वर्धिनीच्या सुबोधानंद शाखेचा युवक कार्यकर्ता ओंकार किंकर याचा महाविद्यालयीन तिरंदाजी स्पर्धेत चौथा क्रमांक आला व त्याची जिल्हास्तरीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. हार्दीक अभिनंदन!
- बालवाडी विभागाच्या प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या सौ. स्वातीताई कारेकर यांचा 'अनिल-गीता सार्वजनिक न्यासा'च्या वतीने दि. २४ सप्टेंबर रोजी 'आदर्श पूर्व प्राथमिक शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. वर्धिनीच्या वतीने त्यांचे मनपूर्वक हार्दीक अभिनंदन !
- 'सहाय्यक परिचारिका अभ्यासक्रम' वर्धिनीत गेल्या १६ वर्षांपासून घेण्यात येतो. या अभ्यासक्रमामुळे शेकडो गरजू महिला स्वावलंबी होऊ शकल्या आहेत. **या उपयुक्त अभ्यासक्रमाला नुकतीच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने मान्यता दिली आहे.**
- वर्धिनीचे एक ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. राजेंद्र देवपूरकर यांची सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख या पदावर पुणे विद्यापीठाने नुकतीच नेमणूक केली आहे. तसेच विश्वकोश निर्मिती मंडळावर सदस्य म्हणूनही त्यांची नियुक्ती झाली आहे.
- वर्धिनीच्या समुपदेशन केंद्राचे काम पहाणाऱ्या सौ. मेघा नगरे या पुणे विद्यापीठाच्या 'पोस्टग्रॅज्युएट डिप्लोमा इन स्कुल सायकॉलॉजी' या अभ्यासक्रमामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.

**''समरसता हे भारतीय लोकसंस्कृतीचे आत्मतत्त्व आहे.''** - (प्रा. डॉ. प्रभाकर मांडे)

विभागशः वृत्त

# शाखा विभागवृत्त

## आश्रम :- विज्ञान युगातील

रामकृष्ण शाखेने पाबळ येथील विज्ञान आश्रम, पाबळ या संस्थेला भेट दिली. नव्या प्रयोगांसह शेती, शेळी-मेंढी पालन, माती परीक्षण, भूजल सर्वेक्षण, पॅथॉलॉजी, फॅब्रीकेशन, बांधकाम प्रशिक्षण, इलेक्ट्रीशियन, बेकरी उद्योग आणि संगणक अशा विविध प्रकारच्या विभागातून येथील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळते व खऱ्या अर्थाने त्याच्यातील आत्मविश्वास वाढवला जातो. या संस्थेने ५० कि. मि. परिघातील सर्व खेडी इंटरनेटच्या सहाय्याने जोडली असून तेथील शेतकऱ्यांच्या समस्यांचे इंटरनेटच्या सहाय्याने निराकरण केले जाते. संस्थेकडे आशिया खंडातील दुसरी 'फॅब लॅब' आहे. वेगवेगळी मॉडेल्स तयार करण्यासाठी याचा उपयोग कसा होतो याचीही माहिती या भेटीच्या निमित्ताने सर्वांना मिळाली.

विज्ञान युगातील या 'आश्रमा'मधील प्रसन्नता व आत्मविश्वास घेऊन सर्वजण परतले.

## 'मन करा रे प्रसन्न'

१० वी, १२ वीचे विद्यार्थी कळत-नकळत तणावाखाली असतात. या विद्यार्थ्यांशी संबंधित सर्वजण सतत अभ्यासासंबंधी विचारतात, चिंता व्यक्त करतात. अशा वातावरणातील विद्यार्थ्यांची परीक्षेपूर्वी मनस्थिती अधिक शांत रहावी व प्रसन्नता वाढावी यासाठी शुभेच्छा कार्यक्रमाची रचना असते. १८ फेब्रुवारी रोजी शुभेच्छा कार्यक्रम संपन्न झाला. टाटा मोटर्समधील प्रोजेक्ट मॅनेजर श्री. विनायक गोगटे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अर्चना गोगटे विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आले होते. सौ. अर्चना गोगटे यांनी प्रश्नपत्रिका सोडविण्याची काही तंत्रे विद्यार्थ्यांना सांगून त्यांचा आत्मविश्वास वाढविला तर श्री. विनायक गोगटे यांनी ताणरहीत रहाण्याची आवश्यकता, त्याचे फायदे छोट्या छोट्या प्रसंगातून मुलांना सांगितले. 'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण' या समर्थांच्या वचनाचा विस्तार करीत त्यांनी सर्वांना प्रसन्नतेने परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले.

❖❖❖

## शिबिर वृत्त

### कॅमेरातून मुलांनीच टिपले त्यांचे भावविश्व

अभिव्यक्ती विकास अशा विषयावरचे एक शिबिर १५ ते २१ एप्रिल या कालावधीत संपन्न झाले. ८वी ते १२वी वयोगटातील मुलांसाठी हे शिबिर आयोजित केले होते. काव्यलेखन कौशल्य, लेखन कौशल्य, अभिनय कौशल्य, वक्तृत्त्व विकास असे अभिव्यक्तीचे विषय तर या शिबिरात होतेच परंतु प्रत्येक गटाला एक हँडीकॅम देण्यात आला होता. हँडीकॅम वापरण्याचे शिक्षण देणाऱ्या तज्ज्ञांच्या सहाय्याने सर्व शिबिरार्थी दररोज १ ते १॥ तास कॅमेरा वापरायला शिकत होते.

♦ काव्यप्रतिभा सत्रातून स्फूर्ती घेऊन प्रत्येकाने किमान एक कविता लिहिली. या कवितांचे सादरीकरण रात्र कार्यक्रमात करण्यात आले.

♦ शिबिरातील शेवटचे दोन दिवस हे शिबिरार्थींना लघुपट बनवण्यासाठी राखून ठेवले होते. लघुपटाचा विषय , त्याची पटकथा, अभिनय अशा तपशील तयारीने प्रत्येक गटाने आपला विषय कॅमेराच्या सहाय्याने टिपला. 'पाणी' एक समस्या, प्रदूषण, कागदाचा पुनर्वापर, खाना- खजाना, आम्ही पुत्र

भारतमातेचे असे एकूण पाच लघुपट मुलांनी स्वत: तयार केले. मोबाईल फोन्सवरील ट्यूनसूचा उपयोग काही गटांनी आपल्या लघुपटासाठी केला.

♦ हे शिबिर यशस्वी करण्यासाठी खालील मान्यवर व्यक्तींनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.

श्री. समर नखाते (तज्ज्ञ प्राध्यापक) - चित्रपट कसा बनतो, शॉटस् कसे घेतात

श्री. विरेंद्र वळसंगकर - व्हिडिओ कॅमेराचे अंतरंग व कॅमेरा कसा हाताळावा

डॉ. सौ. संगीता बर्वे (प्रख्यात कवयित्री) - काव्यप्रतिभा विकास

सौ. आश्लेषा महाजन (विख्यात लेखिका कवयित्री) - लेखन कौशल्यविकास

श्री. दिक्पाल लांजेकर- अभिनय कौशल्य

श्री. रामभाऊ डिंबळे - वक्तृत्त्वकौशल्य विकास

व्हिडिओ कॅमेरा प्रशिक्षक

श्री. श्रीकांत पुराणिक श्री. के. संतोष

श्री. राकेश भिलारे श्री. कौस्तुभ पाटील

श्री. सुनील डांगे

♦ सौ. वेदवती जोगी व श्री. श्रीकांत पुराणिक यांनी सचित्र गोष्टीच्या पुस्तकातील चित्रांचा वापर करून एक लघुपट बनवून दाखविला व दोन लघुपट मुलांच्या सहाय्याने व सहभागाने तयार केले.

♦ **प्रेरणा सत्रे -**

डॉ. प्रदीपराव आगाशे - **वर्धिनीच्या प्रार्थनेचा भावार्थ**

श्री. राजाभाऊ लवळेकर - **पसायदान**

श्री. उदयराव गुजर - **निसर्गाच्या सहवासात**

श्री. गिरीषराव प्रभुणे - **भटके विमुक्तांचे जग**

शिबिराचा समारोप प्रख्यात अभिनेते श्री. राहुल सोलापूरकर यांच्या उपस्थितीत झाला.

### *पहावे तेथे प्रदूषण*

'प्रदूषण' या विषयावरील लघुपट बनविणारा शिबिरातील गट मुठेच्या प्रदुषित प्रवाहाचे, भरभरुन वाहणाऱ्या कचरा कुंड्यांचे दृश्य टिपण्यासाठी शिबिरस्थानाबाहेर गेला होता. हवी ती दृष्ये टिपून गट शिबिर स्थानी येऊन स्थिरावला अन् एवढ्यात त्यांच्या कानावर फटाक्यांच्या लडी फुटण्याचे आवाज आदळले. त्यांच्यातील दिग्दर्शक जागा झाला आणि सर्वजण रस्त्यावरील फटाक्यांच्या आवाजाचे आणि वायूचे प्रदूषण कॅमेऱ्यात टिपण्यासाठी धावले.

### *भाषाप्रभू सावरकर*

शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी श्री. राहुल सोलापूरकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची एक आठवण सांगितली. स्वा. सावकरांच्या अखेरच्या दिवसांमधील हा प्रसंग आहे. रत्नागिरी येथे स्थानबद्ध असताना त्यांचा सहवास लाभलेली एक व्यक्ती त्यांना भेटण्यासाठी मुंबई येथे आली. प्रायोपवेशनामुळे अत्यंत अशक्त झालेल्या स्वा. सावरकरांशी ही व्यक्ती संवाद करीत होती. त्याचवेळी ढास लागल्यामुळे स्वा. सावरकरांचा जीव थोडासा कासावीस झाला. त्यांची ही अवस्था पाहून त्या व्यक्तीने 'नर्स, नर्स' अशा हाका मारायला सुरुवात केली. मरणासन्न अवस्थेतही स्वभाषाभिमानी सावरकर आपल्या कृश हातांनी त्या व्यक्तीचा हात जोराने दाबत म्हणाले, ''परिचारिका असा शब्द उच्चारायला तुला लाज वाटते का ?'' हा प्रसंग उपस्थित सर्वांनाच प्रेरित करुन गेला.

**आंबे बोरी वड बाभूळा चंदन । गुणागुणे भिन्न अग्नि एक ॥**

## अभिव्यक्ती विकास शिबिर

- भगिनी निवेदिता शाखेचे याच विषयावरील शिबिर २ ते ६ जून या कालावधीत संपन्न झाले. ३० वर्धिका व युवती यांच्या समवेत ग्रामीण भागातील १० विद्यार्थिनीही या शिबिरात सहभागी झाल्या होत्या .
- उद्घाटन सत्रात प्रा.श्री.शरद वाघ यांनी घरातून सहजपणे घडला जाणारा अभिव्यक्ती विकास असा विषय मांडला. प्रेम, शांती, एकमेकांविषयी वाटणारी आत्मियता, भक्ती अशा कितीतरी गुणांचा विकास घरातून कसा घडत असतो. हे त्यांनी अनेक उदाहरणातून मांडले.
- **नृत्य व अभिव्यक्ती** - हा विषय सौ. मधुरा तांबे यांनी मांडला. भारताला लाभलेली शास्त्रीय नृत्यपरंपरा, लोकनृत्यपरंपरा याची माहिती सांगितली,तसेच त्यांनी भरतनाट्यम् नृत्य प्रकारातील मुद्रा शिकवल्या
- **काव्य व अभिव्यक्ती -** हे सत्र सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. सौ.संगीता बर्वे यांनी रंगवले. कविता सुचते कशी हे सांगता सांगता त्यांनी काही कवितांचे रसग्रहणही सादर केले. या सत्राचा अपेक्षित परिणाम सत्रानंतर शिबिर संपेपर्यंत दिसतच होता. कुण्या वर्धिकेला निष्पर्ण वृक्षाची व्यथा शब्दांकित करावीशी वाटली तर कुणी फुलपाखराच्या मोहक रंगात हरवून गेली होती.
- **ॲनिमेशन तंत्र -** श्री. वीरेंद्र तिखे यांनी ॲनिमेशन चित्रांचे तंत्र शिकवले. शिबिरार्थी वर्धिकांनी काही चित्रे काढून ॲनिमेशन तयार करण्याचा आनंद मिळवला.
- दररोज एक प्रेरणासत्रही झाले.यामध्ये **डॉ. प्रदीप आगाशे** यांनी वर्धिनीच्या प्रार्थनेचा भावार्थ विस्ताराने मांडला. **श्री. महेंद्र सेठिया** यांनी वेगवेगळया क्षेत्रातील जिद्दी व्यक्तींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले तर **श्री.श्रीकांत भोजकर** यांनी नित्य उपासना, प्रार्थना , आरत्या यांचे महत्व विषद करुन सांगितले .
- समारोप सत्रामध्ये **श्री. अभिजित घोरपडे** यांनी निसर्गाचे जीवनाशी असलेले अतूट नाते हळूवार पणे उलगडत निसर्गाची ऋतूगणिक बदलत जाणारी रुपे, त्यातील सौंदर्य खुलवून सांगितले. समारोपाच्या औपचारिक सत्रानंतर गप्पांचे अनौपचारिक सत्र अधिकच रंगले. कृत्रिम पाऊस पाडण्याचे तंत्र, हे तंत्र वापरुन पाऊस पाडतानाचे अनुभव अशा अनेक विषयांवर गप्पा रंगल्या.

### क्षण आनंदाचे ....

* संस्थेचे पूर्णवेळ कार्यकर्ते व सहकार्यवाह श्री. ज्ञानेश पुरंदरे यांना वर्ष २००५ साठी नातू फौंडेशन सेवा पुरस्काराने गौरविण्यात आले. सन्मानपत्र व रोख रु. २५,०००/- असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.
* डी. एस. के. स्कूलच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरशालेय मॅरेथॉन स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात विजय काटे या रामकृष्ण शाखेतील वर्धकाने दुसरा क्रमांक मिळविला. स्मृतीचिन्ह व रोख रु. २०००/- चे बक्षीस त्याला देण्यात आले.
* डॉ. सौ. रोहिणी तेंडूलकर (दिघे) यांनी वाचस्पती पदवीसाठी पुणे विद्यापीठाला सादर केलेल्या प्रबंधास इतिहास विषयातील उत्कृष्ट प्रबंधासाठी असलेला २००५ सालासाठीचा 'बेंद्रे पुरस्कार' जाहीर झाला.

**अैसी कळवळयाची जाती । करी लाभावीण प्रिती ॥**

## थोरांचे बालपण

इयत्ता ५ वी ते ७ वी या वयोगटातील सुमारे १३५ मुलांचे निवासी शिबिर २३ ते २७ एप्रिल, २००६ या कालावधीत संपन्न झाले. मुलांच्या मनात अनेकदा असा प्रश्न येत असतो की मोठं कर्तृत्व गाजवणारी माणसं त्यांच्या लहानपणी कशी होती ?

या शिबिरात साने गुरुजी, डॉ. हेडगेवार, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, जयप्रकाश नारायण, गोदाक्का, रवींद्रनाथ टागोर, डॉ. अरविंदबाबू घोष, स्वामी विवेकानंद यांचे बालपण सर्व शिबिरार्थीसमोर गोष्टींच्या रुपात मांडण्यात आले. या व्यतिरिक्त बंगालमधील १४-१५ वर्षाच्या पाच बाल क्रांतिकारकांच्या जीवनावरील 'मिदनापूरची हॅट्रिक' ही प्रेरणादायी कथा सांगण्यात आली. चरित्र कथनासाठी डॉ. अनीलराव गोडबोले, सौ. संध्या साबणे, श्रीधरपंत फडके, अद्वैत धर्माधिकारी, मिलिंद सबनीस, मोहन शेटे, सौ. आशाताई फडके, मंदार परळीकर या सर्वांचे मार्गदर्शन मिळाले. शिबिराच्या समारोपासाठी सौ. व श्री. कल्याण वर्दे उपस्थित होते. आपला बालपणापासूनचा जिद्दी मित्र लेफ्टनंट जनरल श्री. पंकज जोशी यांचे प्रेरणादायी चरित्र त्यांनी शिबिरार्थींना सांगितले. श्री. पंकज जोशी हे चीन बरोबरच्या युद्धात जखमी झाले व त्यांना दोन्ही पाय गुडघ्याखाली गमवावे लागले. अशा परिस्थितीतही त्यांनी आपले कर्तृत्व, आपला पराक्रम थिजू दिला नाही. नुकतेच ते उच्च लष्करी अधिकारपदावरुन निवृत्त झाले आहेत. त्यांच्या प्रेरणादायी जीवनकथेमुळे शिबिराचा समारोपही नेमका परिणाम साधणारा झाला.

## *करता नवनवे प्रयोग । हाती लागतात शोध ।।*

'शोधांच्या जन्मकथा' हा ५वी ते ७वीच्या गटासाठी तर 'मुलभूत संकल्पनांवर आधारित प्रयोग' हा ८वी ते १२ वीच्या वर्धकांसाठी शिबिराचा विषय होता. २५ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत ही दोन्ही शिबिरे अपंग कल्याणकारी संस्था, वानवडी येथे झाली. २५० शिबिरार्थींनी याचा लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ शिक्षणतज्ञ श्री. पु. ग. वैद्य यांनी केले. शिबिरांचा समारोप ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनील लचके यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. लहान मुलांनी लावलेल्या शोधांच्या रंजक कथा त्यांनी याप्रसंगी कथन केल्या.

### *शिबिरातील विशेष उपक्रम*

- घोषवाक्य स्पर्धा - ५वी ते ७वी गटासाठी प्रदुषण विषयावरती घोषवाक्यांची स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये शिबिरार्थींनी खूप सुंदर घोषवाक्ये लिहून स्पर्धेतील चुरस वाढवली. काही घोषवाक्ये खालीलप्रमाणे -

- **अरे प्रदूषण, प्रदूषण । केले नष्ट पृथ्वीचे आभूषण ।**
- **रंगात रंग, आनंदात आनंद । दिपावलीत प्रकाशाने करूया प्रदुषण मुक्तीचा संकल्प ।**
- **प्रदूषणाची निर्मिती मीच करतो. त्यावर उपायही मीच शोधतो. नवनवीन तंत्रज्ञानाची निर्मितीही मीच करतो. या तंत्रज्ञानाचे तोट्यात रूपांतरही मीच करतो. ओळखा पाहू मी कोण?**
- **माणसानेच तयार केला प्रदुषणाचा हा ताप। मग आता कशाला घेतो तो याचे मोजमाप?**

- निबंध स्पर्धा - ५वी ते ७वी वयोगटातील या स्पर्धेत 'प्रदूषण' या विषयावर प्रत्येक गटाने आपला निबंध सादर केला.

**उंच नीच काही नेणे भगवंत । तिष्टे भाव भक्त देखोनिया ।।**

- प्रसंग नाट्यस्पर्धा - प्रदूषण करणाऱ्या घटकांबाबत जागृती निर्माण करण्यासाठी प्रसंगनाट्य सादर करण्याची स्पर्धाही घेण्यात आली.
- ८वी ते १२ वी वयोगटातील शिबिरार्थींचे १० गट होते. प्रत्येक गटाने एका विज्ञान संकल्पनेची निवड करून त्यावर ५ ते ८ मिनिटे कालावधीचा एक लघुपट बनवायचा होता. हँडीकॅमच्या सहाय्याने सर्व गटांनी आपापले लघुपट बनवले.
- घनता, प्रकाश, उष्णता, गती, साधी यंत्रे या विषयांवरती सर्वश्री डॉ. देवपूरकर, सुनील कुलकर्णी, डॉ. पुणतांबेकर यांची सप्रयोग व्याख्याने झाली.

***अभ्यास 'गड किल्ल्यांचा'*** - बालशाखा व निवेदिता शाखेचे संयुक्त शिबिर गडकिल्यांचा अभ्यास या विषयावर संपन्न झाले. २७ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत झालेल्या या शिबिरात इतिहासप्रेमी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. या वक्त्यांमध्ये अनुभवी, अभ्यासू वक्त्यांचा जसा समावेश होता तसा ७वी मधील एका 'बाल' वक्त्याचाही समावेश होता. कुमार सूरज दिघे याने शिबिरार्थींना गजकथा आणि दुर्गबांधणी विषयक माहिती सांगितली. विशेष म्हणजे हा बालवक्ता वर्धिनीच्याच बालशाखेत येत होता. गटकार्य म्हणून शिबिरार्थींनी शिशूविहार शाळेच्या मैदानावर विविध किल्ल्यांच्या प्रतिकृति बनविल्या होत्या.

कला शिक्षण विषयामध्ये कु. कल्याणी भोईटे यांनी शिबिरार्थींना टिश्युपेपर्सची फुले तसेच फुग्यांपासून आकर्षक शो पीस तयार करायला शिकविले. शिबिराचे उद्घाटन श्री. मोहन शेटे यांनी केले तर समारोपाला इतिहासतज्ज्ञ श्री. पांडूरंग बलकवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

***विक्रयकला अनुभव शिबिर*** - दिवाळीच्या आधी उटणे विक्रीचा अनुभव घेण्याची संधी चार शाखांनी वर्धकांना याही वर्षी दिली. उटणे विक्रीमध्ये ब्रह्मानंद शाखेने ९२० पुड्या, रामकृष्ण शाखेने ७२५ पुड्या, दयानंद शाखेने ११० तर श्रद्धानंद शाखेने २२५ पुड्या उटणे विक्री केली. या विक्रयकला अनुभव शिबिरात खूप छान अनुभव मिळाले. श्रद्धानंद शाखेतील एका वर्धकाने थेट तुळशीबागेत जाऊन दोन तासामध्ये आपल्या जवळील ९० पुड्यांची विक्री करून एक वेगळाच आनंद मिळवला. वर्धिनीतील वरदलक्ष्मी बचत गटाने ११० किलो उटणे तयार करून तर महालक्ष्मी बचत गटाने मेणपणत्या तयार करून त्याची विक्री केली.

**क्षण आनंदाचे ....**

- भगिनी निवेदिता शाखेतील **कु. नेहा नायडू** ही १० मधील वर्धिका पुण्यात नुकत्याच झालेल्या मॅरेथॉन शर्यतीत १७ वर्षाखालील गटात **पहिली आली**. मानचिन्ह प्रशस्तीपत्र व रु. ५०००/- रोख अशा पुरस्काराने तिला गौरविण्यात आले.
- कै. भालबा केळकर नाट्य स्पर्धेत बालवाडीच्या मोठ्या गटाने सहभाग घेतला होता या गटाला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.
- कै. किशाभाऊ पटवर्धन यांची अखेरच्या दिवसात सेवा करणारा रायप्पा चौघुले हा युवक पाबळ येथील विज्ञान आश्रम संचालित व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये ७३% गुण मिळवून दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

**तुम्हा पाहुनी बंधुना धीर यावा । असा पंथ हा एकतेचा धरावा ॥**

## कै. कृ ल पटवर्धन स्मृतिदिन

२९ जुलै हा कै. पटवर्धन सरांचा स्मृतिदिन. या वर्षी या निमित्ताने रविवार दि. ३० जुलै रोजी कार्यक्रम संपन्न झाला. वर्धिनीच्या शाखांमधून लहानाचे मोठे झालेल्या व ज्यांना कै. किशाभाऊंचा सहवास लाभला अशा व्यावसायिक गटातील युवकांनी कै. पटवर्धन सरांच्या आठवणी सांगितल्या. स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्या श्री. मंगेश कश्यप व श्री. जितेंद्र पवार यांनी कै. पटवर्धन सरांच्या शिकवणुकीचा त्यांना व्यवसायामध्ये कसा उपयोग होतो याबाबत अनुभव सांगितले. पत्रे लिहिताना कै. पटवर्धन सर शब्दांचा उपयोग किती विचारपूर्वक करायचे याबाबतचा अनुभव एका कार्यकर्त्याने सांगितला. १२ वीमध्ये असलेल्या एका युवकाने कै. पटवर्धन सरांनी विज्ञान प्रदर्शनामध्ये त्यांचा प्रकल्प पाहिल्यानंतर केलेली सूचना किती मोलाची ठरली याबाबतचा अनुभव सांगितला तसेच शाखेत जायला विरोध करणारे आजोबा कै. पटवर्धन सरांवरील वृत्तपत्रात आलेला लेख वाचल्यानंतर शाखेत जाण्यासाठी कसे आग्रह धरू लागले, ह्याबाबतीतला अनुभव सांगितला.

## काव्यमय श्रद्धांजली

### स्फुल्लिंग

सर आठवतो दिस भेटला होतां तुम्ही ।
कार्य ऐकून तुमचे, विचार करी मी निशीदिनी ॥
तुमची तळमळ अन् कळकळ जाणवली कार्याची ।
स्फुल्लिंग जागवले, दिधली प्रेरणा काहीतरी करूण्या याची ॥
विचार करून गेले होते थकून मार्ग सापडेना ।
काय करावे काही कळेना, विचार चक्र थांबेना ॥
तुम्ही दावला रस्ता 'सुबोधानंद शाखेचा' ।
घे म्हणालात अनुभव आता, शास्त्र शिकविण्याचा ॥
वळू लागली पाऊले, होऊ लागला संवाद मुलांचा ।
आत्मविश्वास, आनंद मिळू लागला, प्रसाद हा तुमचा ॥
आठविते तुमच्या मिष्किल अन् सहज सुंदर स्वभावाला ।
आपुलकीने पुनित केले, अन् दिधले विचारधन या पामराला ॥

**सौ. उर्मिला गुजर**

❖❖❖

---

## माडगावकर ट्रस्ट पुरस्कृत सर्वोत्कृष्ट वर्धक-वर्धिका पुरस्कार (वर्ष २००६)

इयत्ता १०वी, इयत्ता १२वी व पदवीधर अशा तीन गटांसाठी मुंबईच्या माडगावकर न्यासाने हा पुरस्कार वर्धिनीमध्ये सुरू केला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील यश, वर्धिनीच्या कामातील सहभाग, स्वयंस्फूर्तपणे सांभाळलेल्या जबाबदाऱ्या, अभ्यासेतर विविध विषयातील यश अशा विविध निकषांवर या पुरस्कारासाठी निवड केली जाते. ही निवड एक स्वतंत्र समिती करते. तीनही गटातील पात्र वर्धक वर्धिकांच्या मुलाखतीतून वर्ष २००६ साठी खालील तिघांची निवड करण्यात आली.

**पदवीधर गट** - कै. पद्माबाई म. माडगावकर पुरस्कार - श्री. प्रशांत सुधाकर कवडे

**उच्च माध्यमिक गट** - कै. मधुकर ब. माडगावकर पुरस्कार - श्री. निलेश शिवाजी धायरकर

**माध्यमिक गट** - कै. मधुकर ब. माडगावकर पुरस्कार - कु. संदेश सूर्यकांत शेंडकर

**इथे एकता-वाद आता पुजावा । इथे द्वेष, विद्वेष केव्हा नसावा ॥**

### गुणगौरव समारंभ

रविवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी संस्थेचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला. ॲड. गणेश हिंगमिरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अत्यंत प्रतिकूल वातावरणात राहून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले.

'स्व'-रुपवर्धिनीने १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या परीक्षापूर्व अभ्यास मार्गदर्शन शिबिराचा त्यांनाही लाभ झाला होता, याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. कॅनकून व हाँगकाँग येथे झालेल्या वर्ल्ड ट्रेड ऑर्गनाझेशनच्या कॉन्फरन्समध्ये त्यांनी भारतीय श्रमशोध मंडळाच्या वतीने भारतीय प्रतिनिधी मंडळात सहभाग घेतला व तेथील एका महत्वपूर्ण परिसंवादात भारताची भूमिका मांडली होती.

एकूण ११५ जणांना या कार्यक्रमात त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक यशाबद्दल श्री. हिंगमिरे यांच्या हस्ते बक्षिस देण्यात आली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, भूतपूर्व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगितले. विशेषत: पूर्ण प्रतिकूल वातावरणात या सर्वांनी स्वत:ची कशी प्रगती केली, कसा संघर्ष केला या संबंधीचे प्रेरणादायी प्रसंग त्यांनी मुलांना सांगितले. प्रतिवर्षाप्रमाणे काका हलवाई स्वीट सेंटरचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी पेढे वाटून गुणवंतांचे कौतुक केले.

### ओढ कशाची ?

स्वामी विवेकानंद परिक्रमेच्या मार्गावर असताना त्यांना एकदा आईची आठवण झाली. आईच्या भेटीची ओढ अनिवार झाल्याने त्यांनी कलकत्याला जाण्याचा निर्णय केला. दिवस पावसाळ्याचे होते. ब्रह्मपुत्रा दुथडीभरुन वाहत होती. पाण्याला प्रचंड ओढ असल्याने नावाडी पाण्यात नाव घालायला धजत नव्हते. स्वामीजींनी पाण्यात उडी घेतली व नदी ओलांडून ते कलकत्याला पोहोचले आणि आईला भेटले. मुलगा भेटण्याचा आईला आनंद होणं स्वाभाविक होतं.परंतू अत्यंत ओढ असलेल्या, प्रचंड वेगाने वाहणाऱ्या ब्रह्मपुत्रा नदीचे पाणी कापत, (एका अर्थाने) जीव धोक्यात घालून ते आल्याचे समजल्यावर न राहवून आईने विचारले "पाण्याला एवढी ओढ असताना तू जीव का धोक्यात घातलास ?"

स्वामी विवेकानंदांनी उत्तर दिले "आई पाणी त्याच्या ओढीने वाहत होते. मला तुझ्या दर्शनाची ओढ होती म्हणून मी तुझ्या दिशेने पाणी कापत कापत आलो." हा प्रेरणादायी प्रसंग सांगून श्री हिंगमिरे म्हणाले आपल्याला आपल्याला प्रगतीची जर ओढ असेल तर अडथळे कितीही आले तरी ते यशस्वीपणे ओलांडून यशाच्या शिखरावर जाता येत. यशस्वी होण्याची ती तीव्र ओढ मात्र आपल्या मनात असायला हवी."

### कुतूहल जागृत ठेवा

वर्धकांमधील वैज्ञानिक अभिरुचीस प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी विज्ञान दिनाचे आयोजन केले जाते. पाणी, ध्वनी, मानवी शरीर, कचरा व्यवस्थापन या मुलभूत विषयांवर १०० वर्धकांनी ४३ प्रयोग/प्रकल्प सादर केले. परिक्षक म्हणून वर्धिनीचेच विज्ञान विषयातील द्विपदवीधर युवक कार्यकर्ते होते. बालशाखेच्या गटाने आदर्श प्रयोग सादरीकरणाचे विशेष पारितोषिक मिळविले. प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत योगानंद शाखेस प्रथम, दयानंद शाखेस द्वितीय व रामकृष्ण शाखेस तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. गेली सुमारे ८ वर्षे अमेरिकेत उर्जा व पर्यावरण विषयात काम करुन भारतात परत आलेले वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. प्रसाद जमखिंडीकर हे समारोप कार्यक्रमाचे मार्गदर्शक होते. स्वत:तील कुतूहल जागृत ठेवा व सदैव प्रश्न विचारीत रहा असे मार्गदर्शन त्यांनी या प्रसंगी केले.

**रामायण व माहाभारत यांच्या अभ्यासाने एकाच प्रकारच्या कल्पना सर्व देशभर निर्माण होतात. वेद, गीता व रामायण यांच्यावरच्या आपल्या निष्ठा हा सामाईक वारसा नाही का ?** - (लोकमान्य टिळक (मद्रास १९०६))

## वर्धापन दिन कार्यक्रम

- **स्वामी विवेकानंद शाखेच्या** वर्धापन दिनाला प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठानचे प्रमुख कार्यकर्ते मिलिंद एकबोटे उपस्थित होते. स्वामी विवेकानंदांची एकाग्रता, बलदंड शरीर, जाज्वल्य धर्मनिष्ठा याबद्दलचे प्रेरक प्रसंग त्यांनी विद्यार्थांना सांगितले. शिकागो येथे सर्वधर्म परिषदेला उपस्थित रहाण्यासाठी अमेरिकेत पोहोचल्यावर स्वामीजींना किती हाल सोसावे लागले हे सांगून त्यांनी ध्येय गाठताना कितीही कष्ट झाले तरी जी व्यक्ती आपल्या मार्गापासून परावृत्त होत नाही तीच शेवटी यशस्वी होते असे सांगितले. अशा खडतर मार्गावरुन जाऊन यशस्वी झालेल्या काही विद्यमान व्यक्तींची उदाहरणेही त्यांनी मुलांना सांगितली.
- **स्वामी दयानंद शाखेच्या** वर्धापन दिनाला सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.आनंद यादव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अत्यंत सोप्या व सहज संवाद साधणाऱ्या त्यांच्या भाषणाने सर्व जण मंत्रमुग्ध झाले होते.

**त्यांच्या भाषणातील काही महत्वाचे विचार**

- वस्त्यांमध्ये रहाणाऱ्या पालकांच्या पुढे जगावे कसे हा जसा प्रश्न असतो तसाच आपल्या मुलाला कसे शिकवायचे हाही प्रश्न असतो. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न वर्धिनीत निश्चित होतो आहे अशी माझी धारणा आहे.
- परमेश्वर बुध्दी देताना कोणताही भेदभाव करीत नाही.
- वर्धिनीचे युवक कार्यकर्ते शाखेतील मुलांना चांगले घडवतात,अगदी आईबापासारखं त्यांच्यावर प्रेम करतात. तरीही जन्मदात्या आईबापांनी मुलांकडे दुर्लक्ष करता कमा नये. त्यांना अनावश्यक लाडावून ठेवू नये.
- प्रतिकूल वातावरणातून शिकलेली मुलं पांढरपेशी बनतात. अशिक्षित, गरीब आई-वडिलांचं नातं सांगायची त्यांना लाज वाटते. वर्धिनीच्या वातावरणात आलेल्या मुलांनी आई-वडिलांचं नातं विसरता कामा नये.
- कुटुंबात कसं वागावं, मोठ्यांचा मान कसा राखावा हेही वर्धिनीने मुलांना आवर्जून शिकवावं.
- दारिद्र्याची परिस्थिती शिकायला जेवढी प्रेरणा देते तेवढी श्रीमंतीची परिस्थिती देत नाही म्हणून आपल्या दारिद्र्याची खंत वाटू नये.दारिद्र्याकडे, अडचणींकडे पुढे जाण्यासाठी प्रेरणा स्रोत म्हणून पहायला शिका.
- वर्धिनीत आलेल्या मुलांचं भविष्य घडणार आहे हे निर्विवाद पण म्हणून पालकांनी आपली जबाबदारी विसरु नये.

- **स्वामी अखंडानंद शाखा**

**मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार?**

ही गोष्ट तर सर्वांना माहिती असतेच. या रूपकाचा उपयोग वर्धिनीच्या कामाचे मोल वर्धक व पालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी श्री. अतुल नागरस यांनी फार कल्पकतेने केला. स्वामी अखंडानंद शाखेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. १३ वर्षे अमेरिकेत वास्तव्य करून ते आता भारतात परतले आहेत व व्यवसाय करून सामाजिक कार्यातही सहभागी असतात. समाजामध्ये जी वेगवेगळी संकटे निर्माण होतात त्या संकटांची जाणीव समाजामध्ये उत्पन्न

करण्याचे म्हणजेच मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याचे काम वर्धकांनी करणे अपेक्षित आहे असा विषय त्यांनी या प्रसंगी सर्वांसमोर मांडला.

❖❖❖

## परीक्षा पूर्वतयारी शिबिरे

इतिहास भूगोलासारख्या विषयांची तयारी करुन घेण्याच्या दृष्टीने ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास शिबिरे फेब्रुवारी व मार्च या महिन्यांत संपन्न झाली. प्रश्नमंजुषा आणि इयत्ताश: शाखांतर्गत स्पर्धा याद्वारे अभ्यासक्रमाची उजळणी घेण्यात आली. एकूण २२५ विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला.

## सुट्टीतील उपक्रम

*पोहण्याचे प्रशिक्षण –*

रास्ता पेठेतील 'सार्वजनिक गोसावीपुरा मंडळ' यांनी 'स्व'-रुपवर्धिनीला अल्पदरात पोहण्याची संधी शाहू तलाव येथे उपलब्ध करुन दिली. ४५ वर्धक व २० युवकांना या संधीचा लाभ मिळाला.

*आनंद मेळा -*

श्री. राजेश गोवंडे यांनी विद्यार्थ्यांसाठी 'आनंद मेळ्याचे' आयोजन न्यु इंग्लिश स्कूल, रमणबाग येथे केले होते. या आनंद मेळ्यामध्ये ४० वर्धकांनी सहभाग घेतला. या निमित्ताने वर्धकांना ज्येष्ठ व्यंगचित्रकार श्री. मंगेश तेंडूलकर, प्रसिद्ध गायक श्री. संजीव अभ्यंकर, चित्रपट अभिनेते सुबोध भावे, अमृता सुभाष यांच्या मुलाखती ऐकता आल्या, त्यांना प्रश्न विचारता आले. पक्षीतज्ञ श्री. किरण पुरंदरे व जादुगार रघुवीर यांचे जादूचे प्रयोग या कार्यक्रमांनी आनंदमेळ्याच्या उत्साहात रंग भरला.

*मल्लखांब प्रशिक्षण -*

रामकृष्ण शाखेचा वर्धक कु. संतोष घाडगे हा सध्या ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी येथील क्रीडाकुलात शिकत आहे. मल्लखांब या विषयाचे विशेष प्रशिक्षण तो घेत आहे. दिवाळी सुट्टीच्या कालावधीत रामकृष्ण शाखेतील वर्धकांना त्याने मल्लखांबाचे प्रशिक्षण दिले.

*पर्वती वस्तूसंग्रहालयाला भेट -*

स्वामी श्रद्धानंद शाखेतील युवक आणि वर्धक पर्वतीवरील वस्तूसंग्रहालय पाहण्यास गेले होते. संग्रहालय बंद व्हायला फक्त अर्धा तास शिल्लक होता. शाखेच्या कार्यकर्त्याने संग्रहालयाच्या सेवकांना थोडा अधिक वेळ वाढविण्याची विनंती केली. 'स्व'-रुपवर्धिनीचे काम काय आहे हे कळल्यावर त्यांनी वेळ तर वाढवून देण्यासह सर्व सहकार्य केले. वर्धकांनी पेशव्यांचा इतिहास, त्यांनी वापरलेली शस्त्रे याबाबत विस्तृत माहिती करुन घेतली.

*पोवाडा प्रशिक्षण व स्पर्धेतील यश –*

भगिनी निवेदिता शाखेतील १५ वर्धिका शाहीर हेमंत मावळे यांचेकडे पोवाड्याचे प्रशिक्षण घेतले. या वर्धिकांनी राणी लक्ष्मी मंडळ यांनी आयोजित केलेल्या पोवाडा गायन स्पर्धेत सहभाग घेतला होता. एका गटाचा प्रथम तर दुसऱ्या गटाचा तृतीय क्रमांक आला.

*संगणक प्रशिक्षण –*

रामकृष्ण शाखेतील युवकांनी आपल्याच शाखेतील पंधरा जणांना संगणकाचे शिक्षण दिले.

*आकाशकंदील प्रशिक्षण वर्ग –*

दिवाळी सुटीच्या कालावधीत स्वामी रामकृष्ण, भगिनी निवेदिता, स्वामी सुबोधानंद, स्वामी अभेदानंद, स्वामी ब्रह्मानंद या शाखांमध्ये आकाशकंदील प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. श्री. विजय केळकर, श्री विक्रांत दिघे इत्यादींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तुम्ही सर्व मिळून कार्य करा. असे कार्य यशस्वी करण्यासाठी सुसंवाद असू द्या. तुम्ही सर्व एकमनाने जीवनाचा आस्वाद घ्या. तुमचा मंत्र, तुमचा विचार एक असावा. तुमच्या सभेची जागाही एकच ठराविक असावी. तुम्ही सर्वांनी मिळून एकच विचार करावा. तुम्हा सर्वांचा अभिप्राय एकच असावा. हृदये एक असावीत आणि ध्येयही एकच असावे. - (ऋग्वेद, अथर्व. तैत्रि. ब्रा.)

### दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम -

भगिनी निवेदिता शाखेच्या वर्धिकांनी पुणे रेल्वे स्टेशन परिसरात फुटपाथवर रहाणाऱ्या गरीब बांधवांना दिवाळीचा फराळ दिला. वर्धिका अत्यंत आत्मियतेने या प्रत्येक घरात जात होत्या. एका घरातील महिलेने न राहवून या मुलींना त्या कोठून आल्या याची चौकशी केली. मुलींनी त्यांना वर्धिनीच्या कामाची माहिती सांगितल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद उमटलेला वर्धिकांना जाणवला.

स्वामी श्रद्धानंद शाखेने स्वारगेट स्टँड व सारसबाग चौकात थांबणाऱ्या मुलांना एकत्र केले व दिवाळीचा फराळ त्यांना दिला. त्यांच्याशी गप्पा मारून त्यांची माहिती करून घेतली.

### किल्ले प्रतिकृती स्पर्धा -

स्वामी श्रद्धानंद शाखेने किल्ले प्रतिकृती बनवण्याची स्पर्धा घेतली. काही ठिकाणी वर्धकांच्या बरोबरीने पालकही किल्ले बनवण्याच्या कामात सहाय्य करीत होते. त्यामुळे वर्धकांइतकेच ते सुद्धा परीक्षकांची वाट पहात असल्याचे परीक्षण करताना जाणवले. स्वामी ब्रह्मानंद शाखेवर श्री संजय सपकाळ (दुर्गराज प्रतिष्ठान) यांचे किल्ले कसे बनवावेत या विषयावर व्याख्यान झाले. निवेदिता शाखेने इतिहासप्रेमी मंडळींच्या किल्ले प्रतिकृती प्रदर्शनाला भेट दिली.

### आधी ही गाणी बंद करा!

स्वामी श्रद्धानंद शाखेचे वर्धक कार्यकर्त्यांबरोबर संभाजी बागेमधील किल्ल्यांच्या प्रतिकृतींचे प्रदर्शन बघायला गेले होते. संयोजकांनी रसभंग करणाऱ्या गाण्यांच्या रेकॉर्डस् लावल्या होत्या, ही गोष्ट वर्धकांना/कार्यकर्त्यांना खटकली. संयोजकांकडे जाऊन सर्वांनी त्यांना ही विसंगत गाणी बंद करायला लावून पराक्रमी प्रसंगाची आठवण करून देणाऱ्या पोवाड्यांची कॅसेट लावण्याची विनंती केली. संयोजकांनीही कुठलेही आढेवेढे न घेता आपली चूक दुरूस्त केली.

### गुरुपौर्णिमा कार्यक्रम

सर्व शाखांवर गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम झाला. त्यापैकी दोन शाखांचे हे वृत्त-

※ **स्वामी अखंडानंद शाखा** - गुरुने दिलेल्या ज्ञानाचा उपयोग व्यवहारात कसा करायला हवा या विषयी एक प्रसंग प्रमुख वक्ते श्री. मोहन शेटे यांनी विद्यार्थ्यांना सांगितला.छत्रपतींची आई म्हणूनच नव्हे तर गुरु म्हणून राजमाता जिजाऊंनी शिवाजी महाराजांना कसे घडवले हे सांगत आपल्या एकुलत्या एक मुलाला त्यांनी स्वराज्यस्थापन करण्यासाठी कसे प्रोत्साहन दिले, अनेक युध्द प्रसंगी त्यांच्यामागे कशा कणखरपणे उभ्या राहिल्या या संदर्भातील प्रेरणादायी इतिहास सांगितला

※ **स्वामी श्रद्धानंद शाखा -** कु. आरती बाळ व श्री. अजित नाईक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिस्त, कठोर परिश्रम आणि प्रमाणिकपणा या तीन गुणांची आवश्यकता आरतीताईंनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली तर विज्ञान युगात संगणकासारख्या 'गुरु' कडून मिळणाऱ्या ज्ञानाची महती श्री. अजित नाईक यांनी समजावून सांगितली.

**जनं बिभ्रंती बहुधा विवांचसं नानोधर्माणं पृथिवी यथौकसम्।**
**सहस्त्रं धारा द्रविणस्य मे दुहा ध्रुवेव धेनुरनपम्फुरन्ती॥ -(अथर्ववेद)**

'Eternal Gandhi' - या शीर्षकाचे एक प्रदर्शन पुण्यामध्ये भरले होते. स्वामी अभेदानंद शाखेच्या वर्धकांनी हे प्रदर्शन पाहिले. इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या माध्यमातून महात्मा गांधीचे संदेश प्रदर्शनामध्ये दाखवण्यात येत होते. हे प्रदर्शन पाहून मुलांनी खूप प्रश्न विचारले.

*मुरारबाजींच्या पुरंदरावर*

११ जूनला स्वामी दयानंद शाखेची सहल किल्ले पुरंदर येथे गेली होती. पुरंदरच्या विशाल खांद्यांवरुन वाहणाऱ्या थंडगार वाऱ्याने सर्वांचे भान हरपले. पुरंदरेश्वराच्या मंदिरात झालेली उपासना मनाच्या एकाग्रतेची अनुभूती देणारी होती. या भारलेल्या वातावरणातच श्री.ज्ञानेश पुरंदरे यांनी मुरारबाजींच्या जिगरबाज झुंजीची प्रेरक कथा सांगितली. मावळयांचे जीवन, त्यांची स्वराज्याप्रती असलेली निष्ठा याविषयी त्यांनी मांडलेले विचार भारावून टाकणारे होते.

*किल्ले रायगड*

श्रद्धानंद शाखेने आपल्या वर्धकांना रायगडचे दर्शन घडवले. रायगडच्या सहलीकरिता आवश्यक तेवढे शुल्क जमा करण्यासाठी व्यावसायिक गटातील युवकाचे सहाय्य मिळाले.

४३ वर्धक व युवक या सहलीला गेले होते. गडावर आधीच एनसीसीचे २०० कॅडेट मुक्कामाला आले होते. पण त्यांनी वर्धिनीच्या या गटाची सोय त्यांच्याच व्यवस्थेत केली.

*आम्ही विठ्ठलाच्या भजनात न्हालो.....*

आषाढ शुद्ध एकादशीचे औचित्य साधून परंपरेनुसार सर्व शाखेतील वर्धकांसाठी एक कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. युवा किर्तनकार कु. मानसी उपाध्ये यांनी ‘भक्ती’ या विषयावर कीर्तन केले. त्यांना पेटीवर कु. दमयंती शिंदे व तबल्यावर कु. शैलेजा कालेकर ह्यांनी साथ केली. ‘संत सावता माळ्याच्या मुलीची पांडुरंगाबरची भक्ती’ ही कथा त्यांनी सांगितली. सर्व वर्धक या भक्तिरसात रंगून गेले होते.

*विठूचा गजर, हरिनामाचा झेंडा रोविला !*

स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धक घोरपडे उद्यानात थांबलेल्या वारकऱ्यांच्या दिंडीत सामील झाले. तिथे असलेल्या वारकऱ्यांसमोर त्यांनी काही भक्ती गीते सादर केली. या अनपेक्षित स्वागताने वारकरी खुष झाले. नंतर सर्वांनी मिळून विठ्ठलनामाचा गजर करुन परिसर दुमदुमवून टाकला.या छोट्या वारकऱ्यांना सर्वांबरोबर प्रसादाचा लाभ मिळाला. दिंडीच्या प्रमुखाने श्रीफल देऊन वर्धकांना शुभेच्छा दिल्या व अपेक्षा व्यक्त केली की अशीच चांगली भक्ती गीते विद्यार्थ्यांकडून पाठ करुन घ्यावीत.

*हिरवी छाया हिरवी माया। पानोपानी हिरवी किमया।।*

रामकृष्ण शाखेने दि. १६ जुलै रोजी लोणावळया-जवळील आय.एन.एस. शिवाजीच्या मागील बाजूस असलेलया नागफणी डोंगराजवळ १००० बांबूची रोपे लावली. लोणावळयातील पावसाचा आनंद घेत घेत ४५ वर्धक व युवकांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वी केला. या प्रसंगी फॉरेस्ट ऑफिसर श्री.प्रवीण काळे यांनी वर्धकांना पर्यावरण संतुलनाचे मानवी जीवनातील महत्व समजावून सांगितले.

**मातृभूमी ही ध्रुवधेनू आहे. ती निश्चल भावांनी स्थित आहे. नाना प्रकारचे जन तिच्यावर आपापल्या स्थानी बसले आहेत. या सर्वांना ही मातृभूमी समान प्रेमाने पाळीत आणि पोषीत आहे. -(अथर्ववेद)**

# शाखांवर वर्षभरात झालेले विविध कार्यक्रम/उपक्रम

### वर्षभरात झालेली व्याख्याने

- श्री. मोहन शेटे - क्रांतिकारक कथा
- श्री. शिवाजी खरात - अभ्यास कसा करावा
- श्री. नितीन भिलारे - ओळख व्यवसायाची
- श्री. निशिकांत वाईकर - सापांची ओळख
- अभ्यास कसा करावा - डॉ. रा.ल. देवपूरकर
- स्वावलंबन-एक सवय - सौ. मेघा नगरे
- छंदातून घडणारे व्यक्तिमत्व - श्री. विजय दीक्षित
- शहीद भगतसिंग - श्री. संदीप जोगळे
- भारतीय घटनेचे महत्त्व
- वासुदेव बळवंत पुण्यतिथी निमित्त-देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम व क्रांतीवीर वासुदेव बळवंतांचे चरित्र
- पोस्टर बनवून परिसरात लावणे
  विषय - 'पर्यावरण वाचवा - देश वाचवा', 'आजच्या युगातील विज्ञानाचे महत्व', 'वीज-राष्ट्रीय संपत्ती', 'हिवतापाचा प्रसार कसा होतो', 'प्रदुषणाचा भस्मासूर' 'पाणी जपून कसे वापरावे'.

### अन्य उपक्रम-

- जाहीरात स्पर्धा • हस्तकला • निबंध स्पर्धा
- चित्रकला स्पर्धा • चांदणी भोजन.
- टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवणे
- २१ इंग्रजी शब्द लिखाण (दैनंदिन)

बालेवाडी येथे भरलेल्या राष्ट्रीय बालविज्ञान प्रदर्शनाला रामकृष्ण, निवेदिता, आजोळ, स्वामी दयानंद शाखेतील तसेच वर्धिनीत चालणाऱ्या संस्कार वर्गातील विद्यार्थ्यांनी भेट दिली.

स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धकांच्या पालकांची सभा झाली. श्री प्रकाश आमटे यांच्या कार्यावर आधारीत 'प्रकाशाच्या पाऊलवाटा' हा लघुपट पालकांना दाखवण्यात आला. अशीच पालकसभा स्वामी दयानंद शाखेने या कालावधीत घेतली.

स्वामी दयानंद शाखेतील वर्धकांसाठी आकाशदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. टेलिस्कोप व सी.डी.च्या सहाय्याने श्री विघ्नेश साने यांनी विद्यार्थ्यांना रात्रीच्या आकाशातील सौंदर्याचे दर्शन घडवले.

रामकृष्ण शाखेच्या विद्यार्थ्यांनी अपंग चित्रकार श्री कोहली यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. वायु दलात काम करताना दोन्ही हात गमावून सुद्धा तोंडात ब्रश धरुन चित्रे काढण्याची कला श्री कोहली यांनी साध्य केली. धडधाकट व्यक्तींनी आश्चर्याने तोंडात बोटे घालावीत अशी सुंदर चित्रे या चित्रकाराने काढली आहेत. वर्धकांनी त्यांची अनौपचारीक मुलाखत घेतली.

प.पू.श्री.गुरुजी जन्मशताब्दीच्या निमित्ताने समर्थ रामकृष्ण शाखेने पूर्व भागातील शाळांसाठी स्पर्धांचे आयोजन केले होते. यात ५ वी ते ७ वी गटातील पसायदान गायन स्पर्धेत एकूण ९ शाळांनी भाग घेतला. त्यातील विजेत्या शाळा खालीलप्रमाणे :

प्रथम क्र.- स्व. शामराव कलमाडी कन्नड माध्यम शाळा
द्वितीय क्र.- विद्यानिकेतन. क्र.२
तृतीय क्र.- मुलींचे आगरकर हायस्कूल

या स्पर्धांना परिक्षक म्हणून श्रीमती वसुधाताई पाळंदे, श्रीमती कमलाताई टाककर व सौ. शुभदा नांदे यांनी काम पाहिले.

तसेच ८ वी ते १० वी गटातील विद्यार्थ्यांसाठी सामान्यज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक आबासाहेब अत्रे दिन प्रशालेचा(इंग्रजी माध्यम), तर द्वितीय क्रमांक शेठ हिरालाल सराफ प्रशालेने प्राप्त केला. प्रश्नमंजूषा स्पर्धेचे संचालन लताताई टिळेकर यांनी केले.

**भारतात कोठेही जा एखाद्याचा चुकूनही दुसऱ्याला पाय लागला तर तो केवळ क्षमा न मागता अभिवादन करतो. त्याचे कारण भारतीय समाजजीवनात एकात्मता आहे. त्यांची संस्कृती एक आहे.**

*मुलांच्या शाखेत भोंडला?*

स्वामी अभेदानंद शाखेने भोंडल्याचा कार्यक्रम घेण्याचे ठरवले तेव्हा काहींच्या भुवया उंचावल्या. मुलांच्या शाखेत भोंडला? हो! कार्यकर्त्यांनी भोंडल्याचा कार्यक्रम शाखेशी संबंधित महिला पालकांसाठी कार्यक्रम ठरवला होता. सांस्कृतिक गोष्टींचे आकर्षण इतके असते की, या कार्यक्रमाला जवळपास सत्तर महिला पालक उपस्थित होत्या. पारंपारिक व कालसुसंगत अशा गीतांनी भोंडल्याचा कार्यक्रम तर रंगलाच पण त्या पार्श्वभूमीवर झालेल्या पालकसभेचा कार्यक्रमही उत्तम झाला. ''पालकांच्या मुलांकडून असलेल्या अपेक्षा'' या विषयावर सौ. मेघा नगरे यांनी पालकांशी संवाद साधला. श्रीमती पुष्पाताई नडे यांनी वर्धिनीच्या द्वारे महिलांसाठी चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली.

**क्रीडा दिन २००६**

४१२ वर्धक-युवकांच्या अत्यंत अटीतटीच्या क्रीडा स्पर्धा रविवार दि. १७ डिसेंबर या दिवशी विजेतेपद मिळविण्यासाठी सर्व शाखांवर अत्यंत कसून सराव चालू होता. आपल्या क्रीडा प्रकारातील चापल्य, वेग, दम या कौशल्यांच्या वाढीसाठीही मन:पूर्वक कष्ट घेतले जात होते.

- इयत्ता ५वी - ६वी च्या गटातील लंगडीच्या स्पर्धा अत्यंत प्रेक्षणीय ठरल्या. त्यात स्वामी दयानंद शाखेच्या वर्धकांची लंगडी इतकी वेगवान होती की, प्रत्येकजण किमान डझनभर गडी बाद केल्याशिवाय लंगडी सोडायचाच नाही. त्यांनी निर्विवाद वर्चस्व राखत लंगडीचे विजेतेपद मिळविले.
- ७वी-८वीच्या गटातील स्पर्धेत अत्यंत कौशल्यपूर्ण खेळ करीत डॉजबॉलचे विजेतेपद स्वामी विवेकानंद शाखेने प्राप्त केले.
- ९वी ते १२वीचे कबड्डीचे सामने अनेक रांगड्या खेळाडूंचा परिचय देऊन गेले. समर्थ रामकृष्ण शाखेने सलग ४ थ्या वर्षी विजेतेपदाचा मान पटकविला.
- युवकांच्या रंगतदार व्हॉलीबॉल स्पर्धांचे विजेतेपद स्वामी ब्रम्हानंद शाखेने मिळविले.
- सर्व इयत्तांच्या स्वतंत्रपणे ५० मी. धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. कु. आरतीताई बाळ यांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप करण्यात आले. या सर्व स्पर्धांचे संयोजन स्वामी योगानंद शाखेच्या युवकांनी केले होते.
- भगिनी निवेदिता शाखा, आजोळ, संस्कारवर्ग, वीर अभिमन्यू बालशाखा यामधील वर्धक वर्धिकांच्या क्रीडा स्पर्धाही याच दिवशी विद्यानिकेतन क्र. २ या शाळेत संपन्न झाल्या.

गटकार्याचा विषय म्हणून निवेदिता शाखेतील एका गटाला रास्तापेठेतील एका मंदिराला भेट देऊन मंदिराचा इतिहास माहिती करुन घ्यायला सांगितले होते. या मंदिराचे पुजारी आणि विश्वस्त यांना या मुलींच्या भेटीचे कारण समजल्यावर खूप आनंद झाला. त्यांनी मंदिरा-संबंधीची सर्व जुनी कागदपत्रे काढून मंदिराची तपशीलात माहिती सांगितली व मंदिराच्या संबंधीची सीडी पहायला येण्याचे निमंत्रणही दिले.

**आणि रडू आलं.....**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणूकीत दगडूशेठ गणेशमूर्तीच्या रथापुढे वर्धिनीचे पथके दरवर्षी खेळ सादर करतात. अखंडानंद शाखेचा वर्धक सोहेल शेख हा आजारी असल्याने त्याला या मिरवणुकीत शाखेतील पथकाबरोबर सामील होता आले नाही. मिरवणुकीनंतर त्याच्या घरी संपर्क करायला जेव्हा युवक कार्यकर्ता गेला तेव्हा सहभागी होता नआल्याचे दु:ख त्याला रोखता आले नाही व तो रडायला लागला.

'माता भूमि: पुत्रो अहं पृथिव्या: । नमो मात्रे पृथिव्यै, नमो मात्रे पृथिव्यै ।।' -(अथर्व वेद)

*रमजानच्या शुभेच्छा*

स्वामी श्रद्धानंद शाखेच्या परिसरात मोठ्या संख्येने मुस्लीम समाज रहातो. रमजानच्या निमित्ताने ईदच्या दिवशी वर्धकांनी शुभेच्छापत्रे तयार केली व परिसरातील तीस मुस्लीम बांधवांच्या घरी जाऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

*व्यावसायिक मेळावा*

नोकरी न करता हिमतीने लहान-मोठा व्यवसाय करणाऱ्या युवकांची संख्या वर्धिनीत कमी नाही. ही संख्या किमान १०० इतकी आहे. या व्यावसायिकांमध्ये वकील व डॉक्टर्स जसे आहेत तसेच दूध , वर्तमानपत्रे इ. गोष्टींची सेवा देणारेही व्यावसायिक युवक आहेत. भेळेची गाडी चालविण्यापासून 'आलू हाऊस' हे स्वत:चे ब्रँडनेम रजिस्टर करुन वेगवेगळ्या राज्यात फ्रँचाईस उघडणारा व्यवसायिकही त्यात आहे. उत्तम पगाराची अधिकारपदाची नोकरी सोडून स्वत:च्या क्षमतेवर विश्वास असल्याने व्यवसायात उतरणारा व्यावसायिकही जसा आहे तसे 'वॉटर प्रुफिंग' या एका विषयात स्वत:चे वैशिष्ट्य निर्माण करुन ८० ते १०० जणांना नोकरीला ठेवणारा व्यावसायिक युवकही या गटात आहे. अशा वेगळ्या वाटेने चालणाऱ्यांच्या शक्तीचा उपयोग वर्धिनीच्या कामाला कसा होईल याचा विचार वर्धिनीची जबाबदारी असणाऱ्यांच्या मनात असतोच परंतु या युवकांच्याही मनात तोच विचार असतो. या विचारांना थोडी गती देण्यासाठी वर्धिनीच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने या गटाचा एक मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला ४२ व्यावसायिक युवकांची उपस्थिती होती.

परिचय सत्रानंतर झालेल्या गटचर्चेने या गटाच्या आगामी वाटचालीची दिशा ठरवायाला मदत केली. या चर्चेत सर्वांचाच सहभाग हा उत्साह वाढविणारा होता. नव्याने व्यवसायात उतरलेल्या व्यावसायिकांचा सहजपणे कर्ज न मिळण्याबाबत व्यथेचा सूर जसा होता तसा 'वर्धिनीची आमच्याकडून काही आर्थिक अपेक्षा असेल तर ती योग्यच आहे' असा आर्थिकदृष्ट्या स्थिरावलेल्या व्यावसायिक युवकांचा आश्वासक सूरही होता. श्री रामभाऊ डिंबळे यांनी या चर्चेत सहभागी होत 'प्रबोध उद्योग' चालवण्यामागची प्रेरणा काय होती व आहे हे उपस्थितांना सांगितले. अशा गटाने ठराविक कालावधीनंतर भेटणे किती उपयुक्त होईल हे विषद केले. अशा एकत्रीकरणाला येण्यात आनंद वाटला पाहिजे, असे एकत्रीकरण ठराविक वेळेच्या बंधनात असले पाहिजे व नियमित येण्यासाठी या 'एकत्र' येण्याला 'श्रद्धेची जोड' हवी असा महत्वाचा विचार श्री रामभाऊ डिंबळे यांनी सर्वांसमोर मांडला. प्रबोध उद्योगचे सर्व संचालक ज्ञानप्रबोधिनीच्या कामाविषयी असलेल्या श्रद्धेतून दर महिन्याच्या ठराविक दिवशी, त्यांनी कष्टाने मिळवलेल्या पैशांमधून जी गुरुदक्षिणा अर्पण करतात त्यातील अनुभव उपस्थित सर्वांना प्रेरित करुन गेले.

***सेवाभारती संस्थेच्या कार्यकर्त्यांची भेट*** -

'सेवाभारती' या सेवाभावी स्वयंसेवी संस्थेच्या वतीने जम्मु-काश्मीरमध्ये अनेक सेवाप्रकल्प चालू आहेत. गेल्या वर्षी झालेल्या भूकंपानंतर या संस्थेने मोठ्या प्रमाणावर मदतकेंद्रे उभारली होती. या संस्थेच्या आवश्यकतेनुसार 'उरी' या गावी एक संगणक केंद्र सुरु करायला वर्धिनीने सहाय्य केले आहे. जम्मुकाश्मीर प्रांताचे सेवाभारतीचे प्रमुख श्री सुदेश पालजी व क्षेत्रीय प्रचारक श्री. जयदेवसिंहजी यांनी संस्थेला भेट दिली.

**भक्ती एक सरे, जाती अप्रमाण ।** -(संत ज्ञानेश्वर)

युवक-युवती कार्यकर्त्यांच्या समवेत त्यांच्या गप्पांचा एक कार्यक्रम झाला. वर्धिनीच्या दोन शाखांनाही त्यांनी भेटी दिल्या तसेच निगडी येथील ज्ञानप्रबोधिनीच्या गुरुकुलाचे काम पाहिले. त्यांच्या या भेटीमुळे व प्रतिकूल वातावरणात सेवाभारती स्वयंसेवी संस्था जे काम करीत आहेत त्या तुलनेत आपण किती सुरक्षित वातावरणात काम करतो हे जाणवले. निर्भयपणे काम करणाऱ्या या कार्यकर्त्यांचे अनुभव ऐकून तेथे जाऊन काम केले पाहिजे अशी भावना अनेक कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाली

### *वार्षिक नियोजन बैठक*

वार्षिक नियोजन बैठक रविवार दि. १८ जून २००६ रोजी संपन्न झाली. बैठकीस ६५ युवक व ११ युवती उपस्थित होत्या.

- ◎ प्रास्ताविक सत्रात श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी प्रास्ताविकात वर्धिनीच्या स्थापनेमागील उद्देश व ते साध्य करण्यासाठी करावे लागणारे परिश्रम, प्राप्त कराव्या लागणाऱ्या क्षमता याचे विवेचन केले.
- ◎ श्री शिरीष पटवर्धन यांनी गतवर्षातील प्रमुख कार्यक्रम व त्या अनुषंगाने संघटनात्मक कार्याचे मूल्यमापन आपल्या सत्रात मांडले.
- ◎ शाखा कार्यात नित्याने येणाऱ्या समस्यांवर कुशलतेने मात कशी करता येईल तसेच आपल्या कार्यपद्धतीतील ताजेपणा कसा टिकवता येईल या विषयावर श्री विलास कुलकर्णी यांनी गटचर्चा घेतली. यात अनेक नवीन कल्पना पुढे आल्या. सर्व नवयुवकांनी चर्चेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.
- ◎ डॉ. विनेश नगरे यांनी मृदगंध गटाच्या पुढील योजनांबद्दल निवेदन केले.
- ◎ सौ. मेघाताई नगरे यांनी वर्धिनीत नुकत्याच सुरु झालेल्या व्यक्तिगत सल्ला व मार्गदर्शन या उपक्रमाची माहिती सांगितली.
- ◎ शाखाप्रमुखांच्या नियुक्त्या शाखा विभाग प्रमुख श्री अमोल उंदरे यांनी जाहीर केल्या.
- ◎ यानंतर नव्या वर्षाच्या उद्दिष्ट निश्चिती-संदर्भात बैठक झाली.
- ◎ समारोप सत्रात प्रा. शिरीषराव आपटे यांनी सामाजिक कार्य करताना सेबेबरोबरच आपल्याही व्यक्तिमत्वातील गुणांचे सहजरित्या वर्धन कसे होत असते हे सांगितले

### *प्रशिक्षण वर्ग*

वर्धिनीच्या शांखांची जबाबदारी त्या त्या शाखा सांभाळणाऱ्या युवक-युवतींवर असते. शाखाप्रमुख, युवक-युवती प्रमुख यांच्यासाठी २७ व २८ मे या दिवशी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. त्यापूर्वी ३ दिवस सर्व प्रशिक्षणार्थी मुळशी तालुक्यातील आठ खेड्यांमध्ये विस्तारक म्हणून काम करुन आले. या प्रशिक्षण वर्गाचा वृत्तांत खालील प्रमाणे-

| व्याख्यान सत्रे | वक्त्याचे नाव |
|---|---|
| - संघ बांधणी | श्री प्रमोद गोसावी |
| - आपली 'प्रार्थना' | डॉ.प्रदीप आगाशे |
| - (गटचर्चा) वर्धिनीचे काम का करायचे, कसे करायचे ? | प्रशांत वेदपाठक |
| - शाखांवर शिकवायचे कसे? | प्राचार्य श्री. विवेक पोंक्षे |

**कणाकणांना अणूरेणूंना - शपथ येथल्या मातीची ।**
**व्यक्ती आता एकच - मानवतेच्या जातीची ॥ -(सौ. विजया जहागिरदार)**

- विस्तारक म्हणून गेलेल्या सर्वांनी आपले अनुभव सांगितले. या सत्राचा समारोप श्री. रामभाऊ डिंबळे यांनी केला. विस्तारक योजनेवरच्या या काही प्रतिक्रिया -

- विस्तारक म्हणून काम केल्याने आम्हाला आमच्यातील गुण व दोष समजले. तसेच गावातील लोकांचे जीवन कसे असते हे समजले.
- अनोळखी घरातही संपर्क करता येण्यासाठी माझे कौशल्य वाढायला हवं, हे जस जाणवलं, तसं माझ्यातील खेळ घेण्याचे कौशल्य वाढीस लागले हेही जाणवलं.
- या शिबिराची कल्पना आवडली. शाखेची जबाबदारी अधिक आत्मविश्वासाने सांभाळू शकेन.
- खेड्यांमधील मुलं शहरातील तुलनेत कुठेही कमी नाहीत हे जाणवलं.

ज्ञानप्रबोधिनीचे पूर्ण वेळ कार्यकर्ते श्री महेंद्रभाई सेठिया यांची मुलाखत घेण्यात आली. बालपण, कार्यकर्ता म्हणून जडणघडण कशी झाली, सामाजिक कार्याची पार्श्वभूमी नसलेल्या घरातील व्यक्ती सामाजिक कार्याकडे कशा पहातात, त्यात सकारात्मक बदल कसे घडवता येतात, ध्येयानुकूल जीवन शैली अशा अनेक मुद्यांना त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली. छात्रप्रबोधन या मासिकाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात संघटन कसे उभे केले त्याविषयीही त्यांनी विस्ताराने सांगितले.

या वर्गाचा समारोप प्रांत प्रचारक श्री. सुहासराव हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाने झाला.

### 'परिचय' कार्यक्रम

नव्याने संपर्कात येऊन वर्धिनीच्या शाखांवर अभ्यास तासिका घेण्यासाठी येणाऱ्या शिक्षक सहकाऱ्यांना वर्धिनीचा विस्तृत परिचय व्हावा या हेतूने ९ जुलै रोजी या कायक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी झालेल्या शिक्षणविषयक चर्चेतून खालील मुद्दे पुढे आले.

१. बदलत्या शिक्षण पद्धतीविषयी प्रशिक्षण शिबिरे युवक व अन्य शिक्षकांसाठी आयोजित करावी .

२. प्रभावी अभ्यासतासिका कशा घ्याव्यात याचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करावे .


३. वेगाने बदलत चाललेल्या कौटुबिक, सामाजिक वातावरणात वर्धिनीच्या शाखांमधून केले जाणारे संस्कार प्रभावी कसे होतील याचा विचार व्हावा .

### शरीरासी आरोग्य संकल्प चित्ती

दयानंद शाखेतील आकाश म्हान्वर हा आठवीतील वर्धक. गेल्या वर्षी वाढदिवसाला त्याने तीन संकल्प केले होते. यावर्षी वाढदिवसाच्या दिवशी जेव्हा वर्धक व कार्यकर्ते त्याला शुभेच्छा देण्यासाठी गेले तेव्हा त्याने अतिशय अभिमानाने सांगितले की मी गेल्यावर्षी ठरवलेले तीनही संकल्प पूर्ण केले आहेत. त्याचे संकल्प होते, १)पोहायला शिकायचे २) सायकल शिकायची व ३) वजन वाढवायचे. तो पोहायला व सायकलही चालवायला शिकला. तसेच त्याने स्वत:चे वजन ७ किलोंनी वाढवले. (अर्थात व्यायाम व आहार याकडे लक्ष देऊन) वर्धिनीची प्रार्थना म्हणताना केले जाणारे संकल्पाचे स्मरण असाही परिणाम साधते.

मानवतेची नातीगोती - पाडित जातील भिंती भिंती ।
हे मुक्तांगण गाईल रंगुन - धून मनोरम प्रेमाची ॥ -(सौ. विजया जहागिरदार)

बचेंगे तो और भी चढेंगे



२२ डिसेंबरची धुकट पहाट. सकाळच्या बोचणाऱ्या थंडीला न जुमानता ३२ युवक पेण-अलिबाग-पालीच्या सायकल मोहिमेवर जाण्यासाठी सज्ज झाले. सायकली ठीकठाक करून ताज्या दमाचे सर्व गडी लोणावळ्याच्या दिशेने मार्गस्थ झाले. सायकल चालविण्याला प्रोत्साहन देणाऱ्या प्रशस्त, गुळगुळीत जुन्या मुंबई पुणे महामार्गाने ताफा लोणावळ्याला पोहोचला. आईने दिलेली पोळी भाजी खाऊन नव्या दमाने खंडाळ्याचा घाट उतरायला सुरूवात झाली. आश्चर्य म्हणजे एक्सप्रेस हायवेवर ३ किलोमीटर सायकल चालवायची संधी मिळाली. सुसाट वेगाने जाणारे वाहनचालक कुतूहलाने सायकल स्वारांकडे पहात होते. शीळफाट्याला डावीकडे वळून पेणच्या दिशेने खडबडीत रस्त्याचे खड्डे चुकवीत मंडळी आगे कूच करीत होते. वाटेत आचार्य विनोबा भावे यांचे जन्मगाव (गागोदे) लागले. तेथील त्यांच्या जन्मस्थानाचे दर्शन घेऊन सायकलस्वार सुर्यास्ताला पेणमध्ये दाखल झाले. पेणच्या मुक्कामात श्री. बापूसाहेब परांजपे, सौ. वासंतीताई देव व श्री. टिळक यांचे आदरातिथ्य लाभले. दुसऱ्या दिवशी उपासना करून ताज्या दमाने सायकलवीर निघाले अलिबागच्या दिशेने ! अलिबागचे दर्शन रमणीय होते. नारळी, पोफळी, सुरूच्या उदंड वृक्षराजीने समुद्रकिनारा डवरलेला होता. मन वेधून घेत होता भरतीच्या वेळी समुद्रात डोलणारा दणकट कुलाबा किल्ला. शिवरायांनी बांधलेला हा एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण किल्ला. भरतीच्या वेळी जलदूर्ग तर ओहोटीच्या वेळेला भूदूर्ग. कुलाबा येथील प्रसिद्ध चुंबकीय वेधशाळा पहाण्याची संधी श्री. उदयराव शेवडे यांच्यामुळे मिळाली. तेथील अधिकारी श्री. प्रकाशजी यांनी हवामानाशी संबंधित खूप माहिती सांगितली.

वरसोलीच्या सुंदर किनाऱ्याने समुद्र स्नानासाठी सर्वांना अधिर केले. ३२ युवकांपैकी १८ जणांनी पहिल्यांदाच समुद्राचे प्रत्यक्ष दर्शन या सहलीच्या निमित्ताने घेतले. वरसोलीतील सौ. व श्री. विनायक मराठे यांनी त्यांच्या घरात अगत्याने आसरा तर दिलाच पण दुसऱ्या दिवशी सकाळी स्वामी रामदेवबाबा यांच्याकडून शिकलेले प्राणायामाचे ८ प्रकार व काही आसने करून घेतली. पाली शेजारील उभ्या चढणीचा सरसगड सायकलस्वारांना खुणावत होता. किल्ल्यावर पोहोचल्यावर आकाशातील असंख्य तारकांचे दिवे तर गडाखाली बल्लाळेश्वर मंदिराचे आरतीचे दिवे या विलोभनीय दृश्याने सर्वांना मोहित केले. दुसऱ्या दिवशी उन्हेरेच्या गरम जलकुंडातील स्नानाने ताजेतवाने होऊन मंडळी उद्धर या गावी श्री. अप्पा केळकर यांच्या घरी न्याहारीला पोहोचले. निर्धुर चूल,

**गाभाऱ्याला नकोत दारे - जरा ठेंगणे करा चौथरे ।**
**पुटे उस्कटा मूर्तिवरची - खुळ्या आंधळ्या रुढींची ।। -(सौ. विजया जहागिरदार)**

वनौषधी बायोडिझेलसाठी उपयुक्त असलेले वनस्पती यांचा परिचय यानिमित्ताने सर्वांना झाला.

परतीचा प्रवास कसोटी पाहणारा होतो ८ किलोमीटरचा वळणाचा घाट चढून वर येणं ही गोष्ट शारीरिक क्षमतांची उत्तम चाचणी होती. घाटात एका गटाला वारकरी बंधुंनी आत्मीयतेने दिलेली केळी तर दुसऱ्या गटाला घाट चढून आल्यावर खाकी वेषातील एरवी कठोर वाटणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यातील माणूसकीचे दर्शन घडले. या अधिकाऱ्याने सायकलीवर घाट चढून आलेल्या या गटाला थंड निरा पाजून उत्साहित केले. घाट चढताना प्रत्येकजण दुसऱ्याला विचारीत होता, ''क्यूं पटेल ! और घाट चढोगे?'' उत्तर मिळत होते ''बचेंगे तो औरभी चढेंगे !''



### क्षण आनंदाचे...

- 'स्व'-रुपवर्धिनीच्या रामकृष्ण शाखेचे एक युवक श्री सुनील पवार यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून पैसे लुटून पळून जाणाऱ्या व गोळीबार करणाऱ्या एका गुन्हेगाराला पकडले. श्री. सुनील पवार हे पोलीस खात्यात नोकरी करतात. त्यांच्या या पराक्रमाचा वर्धिनीला सार्थ अभिमान वाटतो.
- अखंडानंद शाखेतील वर्धक कु. आकाश निर्बगारकर हा हिंदी राष्ट्रभाषा परिक्षेत पुणे विभागात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.
- स्वामी सुबोधानंद शाखेतील युवक श्रीहरी सुतार याने आंतरमहाविद्यालयीन धावण्याच्या स्पर्धेत शंभर मीटर प्रकारात सुवर्णपदक, चारशे मीटर धावणे प्रकारात रौप्यपदक तर चारशे मीटर रिले स्पर्धेत रौप्यपदक पटकाविले.

**माणुसकीचे असे कायदे - शब्दावाचून कैक वायदे ।**
**भाषा भाषा समजून घेतील - एकच भाषा हृदयाची ।।** -(सौ. विजया जहागिरदार)

# महिला विभाग वृत्त

## शिबिर वृत्त

☞ दि. १७ व १८ जून २००६ रोजी 'प्रेरणा' विषय घेऊन महिलांचे शिबिर झाले. ३२ महिला कार्यकर्त्या शिबिराला उपस्थित होत्या.

☞ प्रा. शरद वाघ यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. दैनंदिन जीवनातील अनेक व्यवधाने सांभाळून काम करताना आपल्या कामाची गुणवत्ता कशी वाढवता येईल याबद्दल त्यांनी निरनिराळे दाखले देत मार्गदर्शन केले. प्रत्येक कार्यकर्त्यांच्या अंगी कामाचे कौशल्य, कामावर निष्ठा, कामासाठी सवड देण्याची वृत्ती आणि चौफेर ज्ञान असणे आवश्यक आहे. कामाची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रत्येकाने संवाद कौशल्य वाढवले पाहिजे. समाजात मिसळून गेले पाहिजे असे विचार व्यक्त केले. प्रत्येकाने पुढील दोन सुविचारांचा आग्रह धरला पाहिजे. असे त्यांनी आग्रहपूर्वक सुचविले.

1) I admit. I made a mistake.

2) The least important word is "I".

☞ राष्ट्रसेविका समितीच्या पश्चिमांचल बौद्धिक प्रमुख सौ. सुनिला सोवनी यांनी 'दैनंदिन जीवनातील अंधश्रद्धा' हा विषय मांडला. अंधश्रद्धा या आपणच आपल्या समजुतीतून सुरु केलेल्या रुढी आहेत. वेदांतून, पुराणांतून मांडलेले तत्त्वज्ञान व आपली कृती किंवा विचार यांतील अंतर म्हणजे अंधश्रद्धा असे प्रतिपादन त्यांनी केले. जिजाबाई, अहिल्याबाई, सावित्रीबाई फुले यांच्या गोष्टी सांगून त्यांनी आपल्या कृतीतून, कार्यातून अंधश्रद्धा कशा दूर केल्या हे सांगितले. ज्या ज्या गोष्टींचा आपल्याला उपयोग होतो त्याचे पूजन केले पाहिजे, त्यात अंधश्रद्धा नाही ही आपल्या संस्कृतीची शिकवण आहे असे सांगितले.

☞ दुपारी जेवणानंतर दूरदर्शन मालिकांचे परिणाम या विषयावर सौ. उषाताई दांडेकर यांनी गटचर्चा घेतली. वेगवेगळे १०-१५ प्रश्न सांगून सर्व महिलांना बोलते केले आणि दूरदर्शनमुळे होणाऱ्या वाईट परिणाम कमी होण्यासाठी किंबहुना टाळण्यासाठी दूरदर्शन न बघणे यापेक्षा त्याविषयी एकत्रितपणे निषेध नोंदवणे गरजेचे आहे हे पटवून दिले.

☞ शिबिराच्या पहिल्या दिवसाची सांगता कु. ज्योती शिंदे यांच्या 'पालावरची शाळा' या अनुभव कथनाने आली. लॅपटॉपच्या साहाय्याने त्यांनी पारधी पाड्यांवर त्यांचे काम कसे चालते हे सांगितले तसेच भटक्या विमुक्त लोकांचे जीवनही थोडक्यात सांगितले. चालीरीती ऐकताना उपस्थितांच्या अंगावर आश्चर्यमिश्रित भीतीने काटे उभे राहिले आणि अशा परिस्थितीत लोकांबरोबर राहून काम करणाऱ्या ज्योतीताईंचे, त्यांच्या धैर्याचे, कामावरील निष्ठेचे सगळ्यांनी कौतुक केले.

☞ राष्ट्रसेविका समितीच्या सौ. मीनाताई कानडे यांनी राष्ट्रसेविका समितीच्या संस्थापिका वंदनीय मावशी केळकर यांचे चरित्र सांगितले. संयम, संतोष, समभाव व समर्पण या चार 'स' चा जीवनातील समावेश कामाला कशारीतीने गुणवत्ता मिळवून देतो हा विचार त्यांनी प्रभावीपणे मांडले.

☞ न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेतील सौ. सीमा कांबळे यांनी 'मी व माझी जबाबदारी' असा विषय मांडला. त्यांच्या स्वत:ला ओळखा व स्वत:ची सतत परीक्षा घ्या हा त्यांचा आग्रह सर्वांना पटला. काम चांगले होण्यासाठी आत्मविश्वास, निर्णयक्षमता या

ज्याला आपला गाव आपले शिवार आणि आपला शेजार यांची ओळख नसते त्याला शहाणा कसे म्हणावे ?
- (लोकहितवादी)

गुणांची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली तसेच आपण केलेल्या कामातून (आपल्याला काय मिळाले आणि हातून काय निसटले) हा मुद्दाही मनात घर करुन बसला.

☞ जेवणाआधी श्री जयंतराव कवठेकर सर यांनी 'स्व'-रुपवर्धिनीच्या कार्यातून 'सेवा' हा विषय मांडला.

☞ शिबिराचा समारोप शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुमनताई करंदीकर यांनी केला. महिलांच्या कामाचे कौतुक करुन त्यांनी अजून परिवर्तन कसे करता येईल हे सांगितले यासाठी छोट्या छोट्या साधनांचा, वर्तमानपत्रांचा उपयोग महत्वाचा आहे, त्यातील कात्रणसंग्रह मुलांना शिकवताना उपयोगी पडतात, मुलांच्या प्रत्येक कृतीचे निरिक्षण करुन त्यांचे कौतुक करा असे सूचवून मुलांना प्रोत्साहन द्या. त्यांना बोलत कसं करता येईल याचा सतत ध्यास धरा हे सांगितले अशा कामातून नुसते संस्थेचे काम चांगले होत नाही तर कार्यकर्त्यांचेही त्याबरोबर संवर्धन होत असते असे विचार व्यक्त केले.

### किशाभाऊ पटवर्धन स्वयंरोजगार योजना 'प्रेरणा पुरस्कार'

माडगावकर ट्रस्ट मुंबई यांनी दिलेल्या कायमनिधीतून हा पुरस्कार या वर्षीपासून सुरु करण्यात आला आहे. शिवण वर्गासाठी या ट्रस्टने देणगी दिली आहे. शिवण प्रशिक्षण वर्गात पहिल्या दोन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या महिलांना या योजने अंतर्गत शिवण यंत्रे भेट देण्यात येणार आहेत. या योजने अंतर्गत पहिला पुरस्कार वितरण कार्यक्रम शनिवार दिनांक १५ जुलै रोजी संपन्न झाला. माडगावकर ट्रस्टच्या वतीने सौ. नेहा गिध व त्यांचे सर्व कुटुंबीय उपस्थित होते. त्यांच्याच हस्ते या प्रशिक्षण वर्गात पहिल्या दोन क्रमांक मिळवणाऱ्या (१) कुमारी चित्रा हरणापल्ले (२) सौ. सुजाता मिलींद कुलकर्णी यांना शिवणयंत्रे भेट देण्यात आली. प्रशिक्षण वर्ग पूर्ण केलेल्या या वर्गातील सर्व महिलांना प्रशस्तिपत्रक व शिवणसाहित्याचे एक 'किट' भेट देण्यात आले. प्रमुख वक्त्या म्हणून महिला प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या 'दृष्टि' संस्थेच्या सौ. रंजना खरे उपस्थित होत्या.

### कार्य परिचय बैठक

शारदामणि महिला विभागाद्वारे चालणाऱ्या विविध प्रकल्पांचे काम समजून घेण्यासाठी देशभरात महिलांसाठी चालणाऱ्या संस्था व संघटनांच्या समन्वयाचे काम पाहणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती गीताताई गुंडे या ९ व १० जुलै रोजी वर्धिनीमध्ये आल्या होत्या. महिला विभागातील प्रत्येक प्रकल्पात काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यां बरोबर त्यांच्या गप्पांचा कार्यक्रम झाला. भगिनी निवेदिता शाखेतील युवतींबरोबरही त्यांची बैठक झाली. वर्धिनीद्वारे चालणाऱ्या विविध उद्योगशिक्षण व अन्य उपक्रमांचे वैशिष्ट्य समजून घेतले. देशभरात चालणाऱ्या विविध सामाजिक संस्थांचा नंतर त्यांनी उपस्थितांना परिचय करुन दिला तसेच अनेक प्रेरणादायी अनुभवही सांगितले.

### बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग

या अभ्यासक्रमाला एकूण १० विद्यार्थीनी होत्या. या सर्व विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या. या अभ्यासक्रमामध्ये सौ. स्वाती कोंडे ही विद्यार्थिनी ८४% गुण मिळवून पहिल्या क्रमांकाने, ७२% गुण मिळवून कु. मधुरा कारेकर दुसऱ्या क्रमांकाने तर ६९% गुण मिळवून कु. प्राची चव्हाण तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. पोलीस खात्यातील महिला अधिकारी सौ. संगीता यादव यांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

> जगात कोठेही जा भाषा बदलली की संस्कृती बदलते; पण भारत हा देश याला अपवाद आहे. भाषाभिन्नता असूनही संस्कृतीची एकात्मता येथे टिकून आहे. -(दुर्गाबाई भागवत)

### मनापासून सेवा करा, सतत शिकत रहा !

'गृहपरिचर्या' होमनर्सिंग अभ्यासक्रमाचा वर्ग नुकताच पूर्ण झाला. या वर्गाला २९ विद्यार्थिनी होत्या या वर्षी या बॅचमधील २८ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या.

शुभेच्छा देण्यासाठी सन्माननीय श्री. कोंडेजकर व श्री महेंद्र सत्तुर उपस्थित होते.

अशाच प्रकारे बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाचा शुभेच्छा कार्यक्रमही संपन्न झाला.

### 'चाकोरीतून' बाहेर पडू या–

उद्योगशिक्षण, बचतगट, साक्षरतावर्ग अशा विविध माध्यमातून वर्धिनीच्या संपर्कात असलेल्या महिलांपैकी ८० जणी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. श्रीमती सुमित्रा भावे यांचा 'चाकोरी' हा लघुचित्रपट या वेळी महिलांना दाखवण्यात आला.

हा चित्रपट पाहिल्यावर झालेल्या चर्चेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. ''पाठिंबा देणाऱ्या सहकाऱ्यांची माणसाला किती गरज असते'', ''पायातील पैंजण गळाले म्हणजे जणू तिला जखडून ठेवणारी बेडीच गळून पडली'' अशा प्रकारच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया महिलांनी व्यक्त केल्या.

### काल्यचिं बी पेर गं सुने !

शारदामणी महिला विभागाच्या वतीने सर्व प्रकल्पातील महिलांसाठी भोंडल्याचा कार्यक्रम घेण्यात आला. १५० महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला पारंपारिक गाणी व खेळ झाले. होम नर्सिंग कोर्सच्या विद्यार्थिनींनी संस्कारभारती या संस्थेने रचलेली भोंडल्याची नव्या काळातील गाणी व त्यावरचे खेळ सादर केले.

या कार्यक्रमाला श्रीमती वसुधाताई पाळंदे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी भोंडल्याच्या गाण्यामागचा व खेळामागचा हेतू विषद केला. आजच्या काळातही स्त्रिया संघटीत असण्याची समाजाच्या दृष्टीने किती आवश्यक आहे हे सांगून या संघटित शक्तीतूनच दुष्टांच निर्दालन करणाऱ्या नवरात्रातील दुर्गा, काली, महिषासूर मर्दिनी उभ्या राहतात, असे विचार त्यांनी याप्रसंगी मांडले.

याप्रसंगी बचत गटातील महिलांनी उटणे, मेणपणत्या व अन्य वस्तूंची विक्री केली.

---

### 'मी' कशी आहे ? कशी असावी ?

२५ फेब्रुवारी २००६ या दिवशी महिलांसाठी दिवसभराची कार्यशाळा झाली. उपस्थिती ७५ होती. सौ. मेघाताई नगरे यांनी विविध प्रकारचे खेळ घेतले. त्यातून महिलांना आपला स्वभाव नेमका कसा आहे ? एखादे काम आपल्याला लवकर कसे करता येईल, अचानक एखादा प्रसंग आला तर निर्णय कसा घ्यावा, एकाग्रतेने एखाद्या गोष्टीत कसा सहभाग घ्यावा या विषयी रंजकतेने मार्गदर्शन मिळाले. आपण इतरांच्या बाबतीत खूप बोलतो पण स्वत:विषयी मात्र बोलत नाही किंवा अनेक वर्षे एखादी व्यक्ती आपल्या सानिध्यात असते पण त्याच्यावर विश्वास टाकण्याऐवजी अगदी नव्याने संपर्कात आलेल्या व्यक्तीवर आपण पूर्ण विश्वास टाकतो असे अनेकवेळा घडते. अशा प्रसंगी नेमके काय केले पाहिजे याविषयी सौ. मेघाताई यांनी वेगवेगळे अनुभव सांगत मार्गदर्शन केले. मी स्वत: एक चांगली महिला आहे. मला माझ्या क्षमता, माझ्यातील आत्मविश्वास, माझे छंद, याची ओळख झाली आहे का ? मी कल्पक आहे का? असे स्वत:च स्वत:ला प्रश्न विचारुन 'मी' नेमकी कशी आहे , कशी असायला हवी याचा शोध प्रत्येकीने घ्यायला हवा हा विचार या कार्यशाळेच्या निमित्ताने सर्वांपर्यंत पोहोचवता आला.

> सर्व वंशाची माणसे आली आहेत एकत्र। मिसळून गेली आहेत भारत नावाच्या सागरात ।
> त्यात आहेत आर्य, अनार्य आणि द्रविड । सगळेच विशाल सागरात सामावले आहेत ।। -(भारत तीर्थ, रवींद्रनाथ टागोर)

### सेवेतील आनंद आणि कृतज्ञतेचा सुगंध

श्रीमती सुगंधाताई कबीर. गेल्या १२-१३ वर्षांपासून वर्धिनीत कार्यकर्त्या म्हणून काम करतात. वर्धिनीच्या इमारतीसमोरील वस्ती असो किंवा गाडीतळ भीमनगर येथील वस्त्या असो. त्या दिसल्या की अनेक घरातून रहिवासी महिला आपुलकीने चौकशी करताना दिसतात. प्रसंगी खूप दिवस भेट न झाल्याचा लटका रागही संवादात व्यक्त होतो. हे नातं जुळल कशातून? प्रौढ साक्षरता वर्गातून. सुगंधाताईच्या दोन्ही मुलींची लग्नं झाली आहेत, मुलं कमावती आहेत, स्वतःचं घर आहे, नातवंडं आहेत, त्या स्वस्थपणे घरात बसून आयुष्य जगू शकतात. पण त्यांच्या पायाला ओढ आहे सेवावस्तीतील या प्रौढसाक्षर वर्गाची. त्या ज्यांच्यासाठी काम करतात त्या महिलांच्या व कुटुंबियांच्या मनात त्यांच्या विषयीची कृतज्ञतेची भावना आहे. हे जाणवणारा एक प्रसंग भीमनगर सेवावस्तीमधील एका कुटुंबात अलिकडेच घडला. ज्या घरात प्रौढसाक्षर वर्गासाठी संगणक ठेवला व ज्यामुळे त्या घरातील मुलगा संगणक शिकला त्या घरातील कर्त्या पुरुषाचा आपल्या पत्नीशी खालीलप्रमाणे संवाद झाला.

"ऐ शिवगामी ! इतने महिनेसे वो ताई तूझे सिखाती है, अपना बच्चा भी उससे सीखा मगर तुने उसको चाय भी नही पिलाया। "

"अरे बाबा ! तू सही बोलता है। देख मैने ताईको देने के लिए फल लाए है।"

"बस इतनाही। अरे कमसे कम साडी बिडी तो लेना।"

या संवादानंतर या बाईंनी एक साडी व फळांनी भरलेली पिशवी घेऊन कबीर बाईंचे घर गाठले. शिवगामीला आपल्या घरी अचानक आलेले पाहून ताईंना आनंदच वाटला. परंतु तिच्या येण्याचे कारण कळल्यावर काय म्हणावे हे त्यांना सुचेनाच. बाई तुम्हांला साडी आवडली का? नसेल तर .... शिवगामीचे वाक्य पूर्ण व्हायच्या आत सुगंधाताईंनी तिला सांगितले "अग। तू इतक्या प्रेमाने भेट दिली आहेस की ही साडी मी नक्की नेसीन.

### बालवाडी व बालशाखा वृत्त

#### छंदवर्ग

बालवाडीचा मोठा गट व इयत्ता १ली-२री च्या मुलांसाठी छंदवर्ग ३ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत घेण्यात आला. एकूण ४५ जण या छंदवर्गाला उपस्थित होते. 'निसर्ग' या विषयावर आधारीत या वर्गामध्ये सौ. संध्या साबणे यांचे मार्गदर्शन सर्वांना मिळाले.

या वर्गात झालेले विषय -

- सांगितलेल्या गोष्टी - सूर्य व पाथरवट, लाकूडतोड्याची गोष्ट, तहानलेला कावळा, हनुमानाची गोष्ट,
- पपेट शो - डोंगरदादा, पक्षांची गोष्ट, अन्नसाखळी
- माहिती - सागर व नद्यांची माहिती मुलांना सांगण्यात आली
- कृतीसत्रे - मातीकाम - मूर्ती बनवणे
- कागदकाम - टोप्या, पंखा होडी, पत्रपेटी बनवणे, छोट्या कुंड्यांमध्ये रोप लावणे.
- विशेष कार्यक्रम - श्रीराम जन्मोत्सव व हनुमान जयंती कार्यक्रम.

**लहान कोण ? थोर कोण ? कुणी घ्यावे पारखून ।**
**उच्चनिच नुरले काही पांडुरंग सकळ ठायी ॥**

## वर्धिनीच्या इमारतीत लग्न ?



१७ मार्च रोजी सकाळी ७.०० वाजता वर्धिनीच्या इमारतीत सनईचे मंगल स्वर गूंजू लागले. नवे कपडे घालून, नटून थटून बालवाडीचे विद्यार्थी लगबग करीत होते. त्यांच्या शिक्षिका सांगतील ती कामे भराभरा करीत होते. परिसरातील नागरिक कुतुहलाने दारातून डोकावत होते, कुजबुजत होते. एका आजीबाईंनी न राहवून विचारलेच ''वर्धिनीचा हॉल आता लग्न समारंभाला द्यायला लागलात का ?'' प्रश्न ऐकून बालवाडीच्या शिक्षिकांना हसूच आले. ''नाही हो आजी !'' ''मग ही कुणाच्या लग्नाची तयारी ?'' आजीबाईंनी विचारलेच ! ''बाहुला बाहुलीचे लग्न आहे''. हा खुलासा ऐकून आजीबाईही हसत हसत गेल्या. खऱ्या लग्नासारखे नवरदेव बाहुल्याला देवदर्शनाला वाजत गाजत नेण्यात आले. सप्तपदीतून बालशिक्षणाच्या पायऱ्या काव्यमय रीतीने गुंफल्या होत्या. शिक्षिकांनी मंगलाष्टकेही रचली होती. बाहुला बाहुलीच्या लग्नाचा आनंद बालवाडीच्या मुलांच्या चेहऱ्यावरुन ओसंडून वाहत होता. एरवी लग्न समारंभात कंटाळणारी ही मंडळी बाहुला बाहुलीच्या लग्नावर मात्र बेहद्द खूष होती.



## खूप खूप शिका, मोठे व्हा !

बालवाडीच्या मोठ्या गटातील मुलांचा शुभेच्छा कार्यक्रम २९ मार्च रोजी संपन्न झाला. या शुभेच्छा कार्यक्रमाचे संयोजन पालकांनीच केले होते. पालकांनी कार्यक्रमाच्या निमित्ताने आठवण म्हणून एक 'सी-सॉ' वर्धिनीला भेट दिला. आदर्श शिक्षण संस्थेच्या बालवाडी व हायस्कूलच्या मुख्याध्यापिका तसेच रास्ता पेठ एज्यु. शिक्षण संस्थेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षिका या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होत्या.

या छंदवर्गाच्या दरम्यानच सौ. स्वातीताई कारेकर यांचा वाढदिवस होता. त्यांनी छंदवर्गातील सर्वांना चॉकलेटस् दिली. ती चॉकलेटस् देऊन त्या जाण्याच्या आतच ज्ञानेश्वरी यादव या मुलीने त्यांना चॉकलेटच्या कागदाचे फुलपाखरू करून वाढदिवसाची भेट म्हणून दिले.



**आध्यात्मिक लोकशाही वाळवंटात नांदली म्हणून समाजात समरसतेचा विचार रुजला.**

### जय जय रघुवीर समर्थ

दास नवमीच्या निमित्ताने मातृमंदिर विश्वस्त संस्था व महाराष्ट्र शिक्षण परिषद यांनी 'मनाचे श्लोक' पाठांतर स्पर्धा आयोजित केली होती. वर्धिनीच्या बालवाडी व बालशाखेतील ५० जणांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धेत एकास प्रथम क्रमांकाचे व दोघांना उत्तेजनार्थ बक्षिसे मिळाली.

### मोहीम.... कोकण प्रांत

बालशाखेच्या शिबिरासाठी जागा आणि शिबिराचा विषय यावर चर्चा चालू असतानाच कोकणातील तळेरे येथे हॉस्पिटल चालवणारी वर्धिनीची कार्यकर्ती डॉ. सौ. मनिषा नारकर हिचा फोन आला. शिबिर तळेरे येथे घ्यावे असा तिचा आग्रह होता आणि पहाता पहाता शिबिराची जागा व विषयाने कोकणाची दिशा पकडली. शिबिर तळेरे येथे घेण्याचे ठरले. कोकणच्या तांबड्या मातीत 'गडांचा इतिहास' या विषयावर शिबिर संपन्न झाले. विजयदुर्ग, सिंधूदुर्ग या किल्ल्यांना शिबिरार्थींनी भेट दिली. या दोन्ही दुर्गांशी संबंधित इतिहास तेथील स्थानिक कार्यकर्त्यांनी शिबिरार्थींना गोष्टीरुपाने सांगितला. काजूफळांपासून काजू बी बाजूला काढून बाजारात काजू आणण्यापूर्वी त्यावर केल्या जाणाऱ्या सर्व प्रक्रिया, काजू फळाचे सरबत कसे बनवतात हे शिबिरार्थी बालचमूने पाहिले. शिबिरार्थी मुलामुलींनी किल्ल्यांना दिलेल्या भेटींवर आधारीत व काजू प्रक्रियेवर आधारीत प्रकल्प तयार केले. ३ री, ४ थी मधील २१ शिबिरार्थी व ५ कार्यकर्ते या शिबिरासाठी उपस्थित होते. भोजन व्यवस्थेचा सर्व पाहुणचार नारकर दांपत्याने आनंदाने सांभाळला.

### राखी प्रशिक्षण व विक्री

बालवाडीच्या शिक्षिकांनी सर्वांना राखी बनवायला शिकविले. प्रत्येकाने दोन राख्या तयार केल्या. या पैकी एक त्यांनी दुसऱ्याला बांधावयाची होती तर एक राखी विक्रीसाठी ठेवली होती. तीनशे राख्यांची विक्री झाली व बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या खाऊसाठी रु. ६००/- रुपयांची कमाई केली. भविष्यातील 'व्यावसायिक' घडविण्याची सुरुवातच या निमित्ताने झाली.

बालशाखेतील वर्धक संजीवन रुग्णालयामध्ये राखीपौर्णिमेच्या दिवशी गेले होते. रुग्णालयातील सर्व सेवक, अधिकारी आणि रुग्ण यांना राखी बांधून त्यांनी सर्वांशी नातं जोडल.

### माखन चोरांचे स्वागत



गोकूळाष्टमीच्या निमित्ताने श्रीकृष्ण व त्याच्या सवंगड्यांसारखा पोषाख करुन बालवाडीमधील बालांनी परिसरात मिरवणूक काढली. त्यांच्या हातात 'दह्यादुधावर' त्यांचा कसा हक्क आहे याविषयीचे छोटे छोटे फलक होते. घोषणा देत ही मिरवणूक चालली होती. या 'नटखट बाल कृष्णांच्या' मटक्यामध्ये परिसरातील नागरिक कौतुकाने दही घालत होते. जमा झालेल्या दह्याची हंडी मग फोडण्याचा आणि त्यानंतर गोपाळकाल्याचा कार्यक्रम वर्धिनीच्या सभागृहात रंगला.

♦ शिक्षकदिनाच्या निमित्ताने बालशाखेच्या वर्धकांनी बालवाडीचे वर्ग घेतले.

♦ बालवाडीच्या विद्यार्थ्यांना चंद्रग्रहण दाखवण्यात आले. ते पाहिल्यावर मुलांनी चंद्र काळा का झाला ? सूर्य चंद्रासारखा काळा होतो का ? भाजल्यावर

जे कालबाह्य आहे, जे काळाला सुसंगत नाही, जे अनुचित आहे, मानवाला न्यूनता देणारे आहे, मानवी जीवनातील स्वास्थ्य बिघडवणारे आहे आणि सर्वात महत्त्वाचा पैलु म्हणजे सामरस्याला जेथे बाधा येत आहे ते आम्ही झडझडून फेकून दिले पाहिजे. - (महादेव गोविंद रानडे)

आपल्या अंगावर डाग दिसतो तसाच चंद्राला डाग पडला आहे का ? असे अनेक प्रश्न विचारले. बालवाडीच्या ताईंनी मग फळ्यावर चित्रे काढून व गोष्टीच्या माध्यमातून मुलांच्या प्रश्नांचे समाधान केले.

♦ दिवाळीच्या निमित्ताने ताईंनी छोट्या मुलामुलींकडून छोटे छोटे आकाशकंदील व शुभेच्छा पत्रे करून घेतली. दिवाळीसाठी प्रत्येकजण आपल्या घरी स्वत: बनवलेला आकाशकंदील घेऊन गेला.

दिवाळी सुटी सुरू होण्याआधी १४ ऑक्टोबरला बाल विभागाने दिवाळी साजरी केली. ३४ मुलांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. वायुप्रदूषण करणारे आतषबाजी करण्याऐवजी रंगीबेरंगी कागद तुकड्यांची मनोहारी उधळण करणारे दोन मोठे फटाके वाजवून दिवाळी साजरी करण्यात आली.

*बालवाडी वृत्त*

♦ छोट्या गटात ६१ मुले, मधल्या गटात १२० मुले व मोठ्या गटात १३६ मुले अशी एकूण ३१७ मुले आपल्या बालवाडीत आज आहेत.

♦ बालवाडीच्या शिक्षकांसाठी दि. १५, १६ जून रोजी विषय मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.

♦ छोट्या गटातील मुलांची सहल सहकारनगर येथील यशवंतराव चव्हाण उद्यानामध्ये गेली होती. छोट्या छोट्या घरात रहाणाऱ्या आणि दाट लोकवस्तीत रहाणाऱ्या मुलांना मोकळे मैदान, गवताचा सुंदर गालिचा आणि खेळायला भरपूर खेळणी मिळाल्यावर त्यांचे चेहरे एकदम खुलले.

मधल्या व मोठ्या गटाची सहल निगडी येथील अप्पूघर येथे नेण्यात आली. खास मुलांसाठी तऱ्हेतऱ्हेची आकर्षक खेळणी येथे आहेत. काही खेळणी 'साहस' गुणाला चालना देणारी होती. सुरुवातीला काही मुले बिचकली परंतु त्यांच्या ताईंनी समजावून सांगितल्यावर मात्र न भिता मुलांनी सर्व खेळण्यांचा आनंद लुटला

*तुम्ही तुळस कशी वाहिली ?*

दर श्रावणी सोमवारी बालवाडीच्या एका गटाला परिसरातील शिवमंदिरात नेण्यात येते. गटावरच्या ताईंनी शिकविलेल्या गोष्टीतून कोणत्या देवाला काय आवडते हे मुलांचे पाठ झाले. एका सोमवारी यातून एक गमतीचा प्रसंग घडला. परिसरातील एक महिला देवळात आली व तिने तिच्याजवळील तुळशीची पाने महादेवाच्या पिंडीवर वाहिली. बालवाडीतील एक विद्यार्थी त्या बाईंना म्हणाला अहो शंकराला बेल वाहतात. तुम्ही तुळस कशी वाहिली ? तुळस तर विठ्ठलाला वाहतात. मंदिरातील सर्व उपस्थितांना हसू आले व या मुलाचे कौतुक वाटले. या देवळातील पुजाऱ्याने मग या मुलांना बेल, तुळस यातील औषधी गुणांची माहिती खूप सोपी करुन सांगितली, व सर्वांना प्रसाद देऊन आनंद व्यक्त केला.

*आर्युवेद प्रदर्शनाला भेट*

नोव्हेंबर महिन्यात विज्ञान भारती व पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक आर्युवेद परिषद पुणे विद्यापीठ येथे भरली होती. यानिमित्ताने आर्युवेद विषयावरचे भव्य प्रदर्शन भरविण्यात आले होते. वर्धक-वर्धिकांनी या प्रदर्शनाला भेट दिली. सृष्टीची उत्पत्ती, आकाशगंगा, सुर्यमाला, आर्युवेदिक उपचार पद्धती अशा विविध गोष्टींची विस्तृत माहिती या प्रदर्शनामुळे मिळवता आली.

**भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे ।**

### संस्कारवर्ग वृत्त

♦ मुलांच्या मानसिकतेत बराच बदल झाला आहे. आता सर्वजण स्वत:हून अभ्यासात रस घेत आहेत. चित्रकलेची सर्वांना खूपच आवड आहे. 'अकीम' खूप छान चित्र काढतो.

♦ या वर्गातील 'सागर' नावाचा एक विद्यार्थी कोणाचेच ऐकत नसे. खूप अस्वच्छ राहत असे. समजावून सांगूनही त्याच्यात बदल होत नव्हता. शेवटी त्याला संस्कारवर्गाला यायचे नाही असे सांगितले. जवळपास पंधरा दिवस तो आला नाही. नंतर मात्र अतिशय स्वच्छ, टापटीप करुन तो वर्गाला यायला लागला आहे. आता तो सर्वांशी चांगला वागतो. शिक्षकांचे ऐकतो.

♦ ३ री नंतर शाळा सोडून दिलेली 'आरती' या वर्गाला यायला लागली. संस्कार वर्गातील वातावरणामुळे तिच्याही मनात पुन: शिकण्याची इच्छा निर्माण झाली आहे. तिच्या घरी संपर्क केल्यावर तिच्या घरातूनही अनुकूल प्रतिसाद मिळाला आहे.

♦ *अबब ! एवढ्या वर जायच ?*

हा प्रश्न संस्कार वर्गातील विद्यार्थ्यांचा नव्हता तर आजपर्यंत सिंहगड न पाहिलेल्या त्यांच्या ताईंचा होता. सिंहगडची सहल त्यांनीच ठरवली पण गड आधी पाहिलेला नसल्याने काहीच कल्पना नव्हती. सिंहगड चढून जाण्याने व वरुन येणाऱ्या उन्हाच्या कडाक्याने दमछाक होत होती. संस्कार वर्गातील मुलं मात्र ओम्कार दादा, पंकज दादा यांच्याबरोबर वेगाने गड चढत होते. एकूण २५ जण या सहलीला आले होते. सिंहगडाचा इतिहास ओम्कार दादाने सांगितला तर पंकजदादा, मेधाताई यांनी सर्वांना प्रत्येक बुरुजावर नेऊन गडाची माहिती सांगितली. आता कडाडून लागलेली भूक सर्वांना अस्वस्थ करु लागली, पण घरचा डबा, सिंहगडावरील दही आणि देवटाक्याचे गार पाणी याने सर्वांना शांत, तृप्त केले.

### संस्कार 'देशभक्तीचा'

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोन्ही दिवशी लहान मुलांसाठी छोटे कागदी तिरंगी झेंडे व भिरभिरी मोठ्या संख्येने विकले जातात. पालक आपल्या लहानग्यांसाठी मोठ्या हौसेने ते झेंडे विकत घेतात. दुर्दैवाने यातील अनेक झेंडे नंतर रस्त्यावर पडतात, पायदळी पडतात. राष्ट्रध्वजाचा नकळत अपमान होतो हे लक्षातही येत नाही.

वर्धिनीत चालणाऱ्या संस्कारवर्गाच्या विद्यार्थ्यांनी असे झेंडे व भिरभिरी तयार केली व त्याची विक्री केली. परंतु या प्रत्येक झेंड्याबरोबर एक आवाहन पत्रक या विद्यार्थ्यांनी सर्वांना दिले. आपल्या राष्ट्रध्वजाचा नकळतही अपमान होऊ नये याविषयी काय काळजी घ्यावी या बाबत आवाहन करण्यात आले.या आवाहनाला मिळालेला प्रतिसाद उत्साह वाढविणारा होता.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने छोटे कागदी ध्वज खूप हौसेने विकत घेतले जातात आणि दुर्दैवाने नंतर हे ध्वज रस्त्यावरच टाकून दिले जातात. हा आपल्या राष्ट्रध्वजाचा अपमान आहे. भगिनी निवेदिता शाखेने वर्धिकांना २६ तारखेलाच संध्याकाळी परिसरातील रस्त्यांवर फिरुन असे पडलेले ध्वज गोळा करायला सांगितले होते. वर्धिकांना असे काम करताना पाहून रस्त्यावरील एका गृहस्थांनी थांबून त्यांची चौकशी केली. योगायोगाने ते याच शाखेतील दोन वर्धिकांचेच पालक होते. मुलींचे हे काम पाहून त्यांना निश्चितच काहीतरी जाणवले असावे कारण पूर्वी ते आपल्या मुलींना शाखेत पाठवायला उत्सुक नसायचे. या घटनेनंतर मात्र त्यांच्या दोन्ही मुली तर नियमित येतातच पण त्यांची धाकटी बहीणही शाखेत यायला लागली.

**पाहायचं असेल तर आकाशाकडे पहा आणि बोलायचं असेल तर मातीशी बोला.**

- (डॉ. अनंत तोरो)

### प्रौढ साक्षरता वर्ग

प्रौढ निरक्षर महिलांसाठी दोन साक्षरता वर्ग चालवण्यात आले. एकूण ३९ महिलांनी या वर्गाचा लाभ घेतला.

भीमनगर व मरियमनगर येथे चालणारा साक्षरता वर्गातील २५ महिलांची परीक्षा २४ एप्रिल रोजी घेण्यात आली. २५ पैकी १६ जणी या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या. १२ मे, २००६ रोजी झालेल्या कार्यक्रमात त्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात आली. प्रशस्तीपत्रक देण्यासाठी महिला पोलिस अधिकारी आणि वर्धिनीच्या कार्यकर्त्या सौ. संगीता यादव (पी.एस.आय.) या उपस्थित होत्या. उत्तीर्ण झालेल्या महिलांपैकी शैला कांबळे, वैशाली कांबळे, मलर देवेंद्र, प्रिया देवेंद्र, अलका पवार यांनी साक्षरता वर्गाचा त्यांना काय फायदा झाला हे सांगितले. तसेच यापुढेही शिकायला आवडेल असे सांगितले. या सर्व महिलांना आता ४ थी पर्यंतच्या परीक्षांचा अभ्यास करावा असे तीव्रतेने वाटते आहे. त्यांची ही इच्छा सफल करण्याचे या केंद्राचे काम पहाणाऱ्या कार्यकर्त्यांनी ठरविले आहे.

### स्वयंसाह्यता गट वृत्त

♦ **बचतीतून उद्योगाकडे**

या गटातील महिलांसाठी एक व्यवसाय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. जनशिक्षण संस्थेच्या सहकार्याने मेणबत्ती व खडू बनवणे तसेच न्याहारीसाठीचे रूचकर पदार्थ बनवणे (सामोसा, कचोरी, ढोकळा, खवा बर्फी इ.) याचे प्रशिक्षण देण्यात आले. एकूण १५ जणांनी यात भाग घेतला. विषयांचे मार्गदर्शन जनशिक्षण संस्थेचे श्री. कांबळे, श्री. कुलकर्णी व सौ. खांडेकर यांनी केले.

♦ 'स्व'-रुपवर्धिनीच्या मुख्य इमारतीच्या परिसरातील व वर्धिनीच्या शाखांच्या क्षेत्रातील गरजू महिलांचे बचत गट बांधण्याचे व त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम वर्धिनी गेल्या वर्षापासून करीत आहे. अशा बचतगटांची संख्या आता १५ झाली असून या माध्यमातून ३०० महिला जोडल्या गेल्या आहेत. या सर्व बचतगटांची त्यांच्या नावाने बँकेत खाती आहेत.

#### ... तर मंगळसूत्र गहाण ठेवावे लागले नसते !

या बचतगटांच्या निमित्ताने गरजू महिलांचे प्रश्नही लक्षात येत आहेत. याचे एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. वर्धिनीच्या श्रद्धानंद शाखेशी संबंधित महिला पालकांचा एक गट नुकताच बांधला गेला. मासिक बैठकीच्या निमित्ताने सदस्य महिला मोकळेपणाने आपल्या अडचणीही सांगतात. बचत गटाच्या माध्यमातून आपणच केलेली बचत कशी उपयोगी पडणार आहे हे लक्षात आलेल्या या गटातील एक महिला पालक म्हणाल्या, "ताई ! आमचा बचत गट याच्या आधी जर बांधला गेला असता तर माझ्या मुलीच्या ११वीच्या प्रवेशासाठी सावकाराकडे मला माझे मंगळसूत्र गहाण ठेवावे लागले नसते".

प्रत्येकाच्या पिंडात अहंभावाच्या अनेक लहानमोठ्या गाठी असतात, ग्रंथी असतात, गंड असतात. या सर्वांची उकल करता आली तरच क्षुद्र अहमचा लोप होऊन आत्मभान येते. असे आत्मभान सामाजिक भानाचा आदर करणारे असते आणि अस्तित्व भानाचा अंश असते. - (प्रा. रमेश कोटस्थाने)




♦ दिवाळीच्या निमित्ताने दोन बचतगटांनी स्वत:च उटणे व मेणपणत्या बनवून विक्री करण्याचा निश्चय केला. सुरूवातीला थोडी भीती वाटत होती, परंतू अनुभव असा आला की बनवलेला माल शिल्लक रहात नाहीत व मागणी मोठी आहे. यामुळे सर्वांचा उत्साह वाढला. उटण्यांचा दर्जा आवडल्याने पुणे म.न.पा. च्या नागरवस्ती विकास योजनेतील एका अधिकाऱ्याने महापालिकेच्या बचत गटातील महिलांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या या गटांना उभारायला अनुमती दिली. स्टॉल्समध्ये उटण्याची विक्री महिलांनी केली. मिळालेल्या नफ्यातील रु. ११०९/- इतकी रक्कम बचत गटातील वर्धकांनी वर्धिनीला देणगी दिली.

---

*आले देवाजीच्या मना....*

बचत गटातील महिलांची सहल काढावी असे मनात होतेच आणि बचतगटातील महिलांनाही वाटत होते की त्यांची सहल वर्धिनीने काढावी. योग जुळून आला आणि बघता बघता ५० जणींचे शुल्क जमा झाले. १९ नोव्हेंबरला महाबळेश्वरच्या दिशेने गाडीने कूच केले. वाईच्या महागणपतीचे दर्शन घेत गाडी पाचगणीत पोहोचली. पाचगणीच्या मुक्कामात टेबल लँडवर सर्व महिलांना घेऊन गेलो. टेबल लँडवरुन दिसणाऱ्या नयनरम्य निसर्गदृश्याने सर्वांना रोमांचित केले. गाडी पुढे निघाली महाबळेश्वराच्या दिशेने पण 'श्री भगवान महाबळेश्वराची' इच्छा आम्ही 'श्री बालाजीच्या' दर्शनाला जावे अशी होती. महाबळेश्वराच्या प्रवेशद्वारी प्रवेशशुल्काची, प्रत्येक पॉईंटसाठी असलेल्या शुल्काची रक्कम ऐकून परतण्याचा निर्णय करावा लागला. अशा प्रेक्षणीय स्थळी आपणच आणलेले डबे खाण्यासाठी, बंद दुकानाच्या बाहेरील फरशीवर बसायलाही पैसे मागितले जातात हा क्लेशकारी अनुभव गाठीशी घेऊन गाडी पुन्हा पाचगणीच्या दिशेने निघाली. मुरंबा बनवणाऱ्या एका फॅक्टरीला भेट देऊन सातारा रस्त्यावरील केतकावळे गावी असलेल्या सुप्रसिद्ध बालाजी मंदिर पहाण्यासाठी निघालो. श्री बालाजींचे अतिशय सुंदर आणि शांतपणे दर्शन मनाला सुखावून गेले. प्रवेशशुल्काचे बोचरे अनुभव जरी त्रासदायक झाले तरी पूर्ण दिवसभरात गटातील सर्वांशी अतिशय मोकळ्या गप्पा मारता आल्या. एकमेकांची चांगली ओळख होण्याच्या दृष्टीने सहल खूपच मोलाची वाटली.

**शरीराच्या कोणत्याही भागाला दुखापत झाली तर वेदना संपूर्ण शरीराला होते.**
**समाजातील सर्व घटकात हा अवयवावयवी भाव उत्पन्न होणे याचेच नाव समरसता.**

### नेत्रचिकित्सा विभाग वृत्त

- नेत्र बाह्यरुग्ण तपासणी केंद्र संख्या - २
- वर्षभरामध्ये घेतलेले आरोग्य विषयक जनजागरणाचे कार्यक्रम -
- शिबिरे - अस्थमा, बालदमा, अशक्तपणा (ऍनिमिया), स्तनपानाचे व कुटूंबनियोजनाचे महत्व या विषयांवर प्रबोधन पर व्याख्याने
- लसीकरण

| लसीकरण | लाभार्थी संख्या |
|---|---|
| रुबेला | ९२ |
| टायफॉईड | ८०८ |
| एम. एम. आर. | ८५८ |
| हिमोग्लोबिन तपासणी | ४३५ |

- स्पर्धा - पाककृती स्पर्धा (जीवनसत्व 'अ' आणि लोहयुक्त आहार) व चित्रकला स्पर्धा
- वृक्षारोपण - 'अ' जीवनसत्व युक्त वृक्षांची रोपे लावण्याचा कार्यक्रम संपन्न.
- पथनाट्चे - गर्भवती महिलांनी घ्यावयाची काळजी, मुलांचा आहार, कुपोषित मुलांचा आहार, जीवनसत्व 'अ', डोळ्यांची निगा, वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व या विषयांवर पथनाट्चे सादर करण्यात आली.
- 'अ' जीवनसत्वाचा डोस - १८४ स्तनदा मातांना देण्यात आला.
- १६४५ पाचवर्षांखालील मुलांना दर सहा महिन्यांनी 'अ' जीवनसत्वाचा डोस दिला जातो.
- साक्षरता वर्ग - याचा लाभ ४० महिलांना झाला
- उद्योग प्रशिक्षण - पापड बनविणे, दागिणे बनविणे याचे प्रशिक्षण १७ महिलांना देण्यात आले
- नेत्रविषयक तपासणी -

| | |
|---|---|
| एकूण संख्या | १७४२२ |
| चष्मे वाटप | ७०६ |
| मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ६० |

- १५ वर्षाखालील मुलांची आरोग्यतपासणी

| | |
|---|---|
| एकूण संख्या | ५१८४ |
| विशेष आजारांसाठी तपासणी | ३५६५ |
| तज्ज्ञांकरवी तपासणी | ६९ |
| कुपोषित मुलामुलींवर उपचार | ५९० |

- पाच वर्षांच्या मुलामुलींना एक हजार पणत्या रंगवण्यासाठी दिल्या व त्याच त्यांना दिवाळीची भेट म्हणून दिल्या.

बालदिनाच्या निमित्ताने पाच वर्षांखालील मुले व त्यांच्या मातांची रक्त तपासणी करण्यात आली.



एकूण २३६ मुले, २२३ मुली व २६० मातांनी याचा लाभ घेतला.

- पौगंडावस्थेतील मुलामुलींसाठी झोळी वाचनालय सुरु करण्यात आले.
- विभागातील कार्यकर्त्यांसाठी संवाद कौशल्य, स्वयंप्रेरणा या विषयांवरती कार्यशाळा घेण्यात आली. ५७ जणांनी यामध्ये सहभाग घेतला.

**एकाच आईच्या अनेक लेकरांत जे नाते असते, असायला हवे,**
**ते बंधुभावाचे नाते समाजातील सर्व घटकात उत्पन्न होणे म्हणजे समरसता.**

# स्पर्धा परीक्षा विभाग वृत्त

## मुलाखत प्रशिक्षण वर्ग

स्पर्धा परीक्षांमधील शेवटचा टप्पा मुलाखतींचा असतो. या मुलाखतीच्यावेळी मनस्थिती कशी आनंददायी ठेवावी, विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देताना कोणती काळजी घ्यायची, स्वत:ला प्रभावीपणे कसे सादर करायचे इत्यादी विषयांचे मार्गदर्शन करण्यासाठी एका मुलाखत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. आय. टी. क्षेत्रातील एक तज्ज्ञ श्री. संजीव मराठे यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली.

## केंद्राचे यश

महाराष्ट्र राज्य प्रशासकीय अधिकारी परीक्षेत केंद्रातील खालील विद्यार्थ्यांची राज्यशासनामध्ये अधिकारी पदांसाठी त्यांची निवड झाली आहे.

| | |
|---|---|
| १) भाऊसाहेब गलांडे | उपजिल्हाधिकारी |
| २) श्रीमती स्नेहा किसवे | उपजिल्हाधिकारी |
| ३) मिलिंद कुलथे | नायब तहसिलदार |
| ४) सचिन भालेराव | नायब तहसिलदार |
| ५) संजय नागटिळक | नायब तहसिलदार |
| ६) श्रीमती सविता जाधव | नायब तहसिलदार |
| ७) सतीश माळी | कक्ष अधिकारी |
| ८) श्रीमती मनिषा कामठे | कक्ष अधिकारी |

## स्पर्धा परीक्षांचे जागतिक महत्व..

केंद्रातील 'अधिकारी' विद्यार्थ्यांची कार्यशाळा, सोमवार दिनांक २५ डिसेंबर रोजी संपन्न झाली.

मुख्य परीक्षेला बसलेले सुमारे ४० विद्यार्थी व अधिकारी पदावर नियुक्त झालेले १२ विद्यार्थी या कार्यशाळेला उपस्थित होते.

२५ डिसेंबर हा वर्धिनीचे संस्थापक कै. कृ. ल. पटवर्धन सर यांचा जन्मदिवस. याचे औचित्य साधून पहिल्या सत्रात कै. किशाभाऊंचे प्रेरणादायी चरित्र उपस्थितांसमोर मांडले गेले.

दुसऱ्या सत्रात उपस्थितांमधील 'अधिकारी' विद्यार्थ्यांपैकी कु. सुप्रिया शिंदे, कु. तेजश्री लडकत, सौ. संगिता यादव, श्री. अजय महिंद्रकर यांनी आपल्या कामातील अनुभव सर्वांसमोर मांडले. यामध्ये कामकरताना नवे तंत्रज्ञान कसे हाताळायाला मिळते, सॉफ्टवेअर पार्श्वभूमी असलेल्यांना आता शासकीय सेवेत कशी संधी मिळू शकते, आपण आपल्या वागण्यात आपल्याला सहाय्य करणारी माणसं कशी जोडू शकतो, नागरिक, राजकीय व्यक्ती व आपले वरिष्ठ यांना कुशलतेने कसे हाताळता येते याबाबतचे अनुभव होते.

तिसरे सत्र श्री. रवींद्र वंजारवाडकर यांचे होते. १० वर्ष प्रशासकीय सेवेतील अनुभव, विशेषत: बरखास्त झालेल्या नगरपरिषदेचे प्रशासक म्हणून काम करताना आलेले अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर विस्ताराने मांडले. या सत्रानंतरचे प्रश्नोत्तराचे सत्रही रंगले.

कार्यशाळेच्या समारोपासाठी जागतिक कीर्तीचे जलतज्ज्ञ श्री माधवराव चितळे उपस्थित होते. स्पर्धापरीक्षांचे असलेले जागतिक स्तरावरचे महत्व त्यांनी विषद केले. फ्रान्स, जपान, चीन यासारख्या देशांनी स्पर्धापरीक्षांच्या माध्यमातून गुणी व्यक्ती अधिकारपदी नेमण्याची कशी परंपरा निर्माण केली आहे, याची उदाहरणे त्यांनी सर्वांसमोर ठेवली. फ्रान्समध्ये सार्वजनिक उद्योगाचा प्रमुखसुद्धा स्पर्धापरीक्षा उत्तीर्ण झालेला असतो. जपानने स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून जीवन क्रांती घडवून आणली. त्यांची 'सामुरा' ही संकल्पना त्यांनी विस्ताराने सांगितली. चीनमध्ये गेली सुमारे २००० वर्षे अस्तित्वात असलेली स्पर्धा परीक्षांमधून गुणवान व्यक्ती निवडण्याची असलेली परंपरा, त्यामध्ये

**मित्र हे नाते जात, धर्म, लिंग या सर्वांच्या पलिकडचे आहे.**
**माणसाला माणूस म्हणून त्याच्या सुखदु:खासहीत स्वीकारणारे आहे.** -(डॉ. राजेंद्र मान)




असलेले तेथील इतिहासप्रसिद्ध राजवाड्याचे स्थान या संबंधीची प्रेरणादायी माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.

तिबेटमधील 'लामा' निवडीची परंपरा ही सुद्धा स्पर्धा परीक्षेचेच उदाहरण आहे हे सांगून भारतीय परंपरा यापेक्षा वेगळी नव्हती ही गोष्टही त्यांनी सर्वांच्या नजरेत आणून दिली.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटीशांनी (त्यांच्या सोयीसाठी) निर्माण केलेल्या कायद्यांच्या आधारावर या देशाचा कारभार सुरु झाला. गणराज्यामुळे नवीन रचना अस्तित्वात आली तरीसुद्धा शासन चालवताना आधीच्या परंपरांच (ब्रिटीश राजवटीतील) ओझं शासन चालवणाऱ्यांवर होतं, यात बदल घडवण्याच्या दृष्टीने प्रशासकीय सुधार समिती स्थापन झाली. या समितीने आपला अहवाल, आपल्या सूचना सरकारला सादर केल्या. परंतु हितसंबंधियांनी सूचित केलेले बदल प्रत्यक्षात येऊ दिले नाहीत. हळू हळू प्रशासकीय व्यवस्थेत बदल होत आहेत 'पंचायत राज' सारखे बदल नंतरच्या काळात झाले आणि आता जागतिकीकरणाच्या टप्प्यावर तर शासनात अधिकारी म्हणून काम करणाऱ्यांपुढे खूप मोठी आव्हाने आहेत. आपल्या देशाकडून जगाच्या काही अपेक्षा आहेत. याचे भान ठेऊन काम करावे लागेल.

---

## समुपदेशन व सल्ला मार्गदर्शन केंद्र वृत्त

- सौ. मेघा विनेश नगरे यांनी या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी निवड चाचण्यांचे आयोजन, अभ्यास कौशल्य मार्गदर्शन व समुपदेशनाचे काम सुरु केले आहे. आजपर्यंत ४५० नवीन विद्यार्थ्यांची चाचणी घेण्यात आली असून त्यातील ९० विद्यार्थी वर्धिनीच्या शाखांमध्ये निवडले गेले.
- भगिनी निवेदिता शाखा, रामकृष्ण शाखा व वीर अभिमन्यू बालशाखेच्या पालकांसाठी झालेल्या मार्गदर्शन - सत्रात सौ. नगरे यांनी खालील मुद्यांवर पालकांशी संवाद केला तसेच काही मनोरंजक खेळ घेतले.

**मुद्दे :**

- मुलांची स्वच्छता • मुलांचा आहार • प्रेरणा
- मिळते जुळते घेणे • मुलांची या वयातील वर्तणूक
- मुलांशी बोलताना, त्यांना हाताळताना घ्यायची काळजी.

- वर्षभरात एकूण ४३ वैयक्तीक केसेस हाताळल्या गेल्या.
- भगिनी निवेदिता, रामकृष्ण, श्रद्धानंद, स्वामी विवेकानंद या शाखांमध्ये 'लक्षात कसे ठेवावे', गुणांचे उद्दिष्ट कसे ठरवावे या विषयासंबंधीची मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.
- वीर अभिमन्यू बालशाखेमध्ये गोष्टींच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व समजावून सांगण्यात आले.
- ११ वी ते पदवी अशा गटातील युवक युवती कार्यकर्त्यांसाठी २५ ऑगस्ट रोजी तीन तासांची कार्यशाळा घेण्यात आली. २६ जण या कार्यशाळेला उपस्थित होते. कार्यशाळेत 'सेल्फ अवेअरनेस' या विषयावरचे सत्र व गटचर्चा घेण्यात आली.
- ८ सप्टेंबर रोजी उद्योगशिक्षण वर्गांना येणाऱ्या महिलांसाठी एक सत्र घेण्यात आले. 'व्यक्तिमत्व' म्हणजे काय या विषयावर चर्चा व खेळ घेण्यात आले.

**धर्म राज्य भेद मानवा नसावे । सत्याने वागावे । ईशासाठी ॥**
- (महात्मा फुले)

## फिरती प्रयोगशाळा विभागवृत्त

- २००५ पासून शिरोली या गावी बिलकेअर फौंडेशनच्या मदतीने ५ वी ते ७ वी तील विद्यार्थ्यांकरता ''वैज्ञानिक प्रयोगातून संकल्पना स्पष्टीकरण'' हा उपक्रम सुरु झाला आहे.

  १८० विद्यार्थ्यांना व शिक्षिकांना याचा लाभ मिळाला.

  प्रयोग व त्यावर आधारित वेगवेगळे वैज्ञानिक खेळ घेण्यात येतात.
- या उपक्रमाचे होणारे लाभ लक्षात घेऊन बिलकेअर फौंडेशनने आणखी तीन गावी काम सुर करण्याची विनंती केली व त्यानुसार तेथेही प्रकल्पाचे काम सुरु झाले.

  बिलकेअर कंपनीतील काही अधिकारी, आवर्जून उपस्थित असतात. त्यांच्या काही प्रतिक्रिया -
- मला आजपर्यंत प्राणवायूमध्ये मेणबत्ती पेटत राहते एवढेच माहीत होते पण ती किती तेजस्वी दिसते हे आज प्रथमच पाहिले. प्रयोग व त्यावरील खेळ अद्‌भुत वाटले.

  (बिलकेअर कंपनीतील एक अधिकारी)
- प्रयोग छोटाच पण अतिशय रंजक रीतीने, वेधक खेळांतून शिकवल्याने ही शास्त्रीय माहिती नक्कीच स्मरणात राहील.

  (सौ. भंडारी मॅनेजिंग डायरेक्टर, (बिलकेअर))
- प्रयोग कसा घ्यावा, त्या आधारे कोणती माहिती सांगावी, छोटे छोटे खेळ व त्याचे साहित्य कसे तयार करावे हे समजल्यामुळे त्यांचा आम्हाला पुढे शिकवताना नक्कीच उपयोग होईल.

  (शाळेतील शिक्षिका)
- विविध खेळांपैकी हवेच्या दाबावरील ३-४ खेळ, जादूची डायरी, लिफ्ट वगैरे खेळ बऱ्याच मुलांनी घरी करुन नंतर शाळेत आणून दाखविले.
- वाळीण गावी प्रयोग दाखविण्यासाठी शाळेशेजारच्या मंदिरात ६वी ७वीच्या विद्यार्थ्यांना एकत्र करावे लागले. सदर शाळेत १ली ते ७वी चे विद्यार्थी आहेत. या सात इयत्तांसाठी ३ वर्ग खोल्या व ३ शिक्षक आहेत. अन्य दोन वर्ग पावसामुळे 'बिकट' अवस्थेत आहेत. भिंतींना, जमिनीला ओल कायम असते. त्याही स्थितीत शिक्षक व विद्यार्थ्यांचा उत्साह थक्क करणारा वाटला.
- ***साप्ताहिक दवाखाना*** – डॉ. सौ. उल्का बोकील या साप्ताहिक दवाखान्याच्या उपक्रमात यावर्षी नव्याने सहभागी झाल्या. डॉ. उषाताई कोठारी यापूर्वी या उपक्रमात सहभागी होत्याच आता त्यांना -डॉ. बोकीलांची साथ मिळत आहे. दर बुधवारी साप्ताहिक दवाखान्याचे काम चालते. सध्या दवाखाना बेलावडे या गावी चालतो. दोन्ही डॉक्टरांना सहाय्य करण्यासाठी गृहपरिचर्या अभ्यास वर्गातील (होमनर्सिंग कोर्स) मधील एकेक विद्यार्थिनी प्रत्येक आठवड्यात या उपक्रमात सहभागी होते. सरासरी ४० रूग्ण व्यक्ती दर आठवड्याला या सेवेचा लाभ घेत आहेत.
- सौ. सिंधूताई जोशी या नव्याने या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत. गणित इंग्रजी व शास्त्र या तीनही विषयांचे त्या उत्तम मार्गदर्शन करतात. निवे, ताम्हिणी सुतारवाडी, शिरोली, खेचरे, बेलावडे, चाले, वाळीण, कोंढावळे व गुजरवाडी या गावातील शाळांमध्ये तासिका घेण्यात येतात. आर्कमेडिजचे तत्त्व, चुंबकाचे प्रकार, ऊर्ध्वपातन,

**निर्मीकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक कशासाठी ॥**
- (महात्मा फुले)

विलगीकरण, घनता, पदार्थांच्या अवस्था, मानवी शरीर, घनता या विषयांच्या तासिका झाल्या.

- इंग्लंडहून वर्धिनीचे काम पहायला आलेल्या कु. स्नेहा मेहता यांनी सुतारवाडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना इंग्लंड देशाची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांनी त्यांना खूप प्रश्न विचारले.
- ताम्हिणी गावी तेथील शिक्षक व विद्यार्थी यांनी गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी शिबिर घ्यायची विनंती केली आहे.
- बेलावडे येथे चालणाऱ्या साप्ताहिक दवाखान्यामध्ये आजूबाजूच्या वाड्यांतून / गावांमधून रुग्ण मोठ्या संख्येने येऊ लागले आहेत, त्यामुळे दर आठवड्याला औषधांची व्यवस्था करावी लागत आहे.
- गुजरवाडी येथेही महिन्यातून दोनदा फिरत्या प्रयोगशाळेचे काम चालते.
- शिवथरघळ येथील श्री समर्थ सेवा मंडळाने कुंभेशिवथर व वरंधा या गावामधील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा विभागाचे सहकार्य मागितले. त्यानुसार १८ ते २१ डिसेंबर या कालावधीत सुमारे २०० विद्यार्थ्यांचे दहावीसाठीचे अभ्यासक्रमातील प्रयोग करुन घेण्यात आले.

## देणगी नव्हे आशीर्वाद

'स्व'-रुपवर्धिनीच्या कामाचा कळत-नकळत परिणाम परिसरात कसा होत असतो याची कल्पनाही काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना अनेकदा असत नाही. तसा कधी मनात विचारही येत नसतो. एखाद्या प्रसंगातून मात्र आशा कामातून काय बदल घडतात याची सुखद अनुभूती मिळते.

'स्व'-रुपवर्धिनीच्या जवळील पारगे चौकात श्री. सी. बी. येल्लूर यांची चहाची गाडी आहे. सुमारे ६५-७० वर्षांचे हे गृहस्थ गेल्या तीस वर्षांपासून याच चौकात 'अमृततुल्य'च्या माध्यमातून हजारो लोकांना चहा पुरवागत. पहाटे साडेपाच ते रात्री नऊ या कालावधीत चहाच्या गाडीवर उभे राहून त्यांचा हा व्यवसाय चालतो. त्यांनी रु. ११,१११/- ची देणगी वर्धिनीला दिली. त्यांचे कष्टाचे जीवन पहाता त्यांनी दिलेल्या देणगीची रक्कम पाहून आश्चर्य वाटले. परंतु त्यासंबंधी काही विचारण्यापूर्वीच ते म्हणाले, "आपल्या संस्थेची इमारत येथे झाल्यापासून या भागात खूप बदल झालेले मी अनुभवतो आहे. आपण जे काम करता त्यामुळे हे बदल झाले आहेत.आपली इमारत नव्हती तेव्हा पारगे चौकात संध्याकाळी चहाचा व्यवसाय करणेही अवघड होते कारण खूप गुंडगिरीचे वातावरण होते. भीती वाटायची. पण जसे आपले काम या इमारतीच्या माध्यमातून वाढायला लागले, तशी-तशी परिसरात सुरक्षितता वाटायला लागली. मी तर आता रात्री नऊ नऊ पर्यंत गाडीवर असतो. आपण फार मोलाचे काम करता त्यामानाने मी दिलेली रक्कम काहीच नाही." त्यांचे हे अनुभव सुखद अनुभूती देणारे तर होतेच पण वंदन करावे असे हे व्यक्तिमत्व या निमित्ताने जवळून अनुभवता आले. त्यांनी देणगी नव्हे तर आशीर्वादच दिला असे जाणवले.


**एक सूर्य सर्वां प्रकाशास देतो । उद्योगा लावीतो । प्राणिमात्रा ।**
**मानवासहित प्राण्यांचे जीवन । सर्वांचे पोषण । तोच करी ॥ - (महात्मा फुले)**

## दु:खद निधन

या कालावधीत मुंबई बॉम्ब स्फोटामध्ये असंख्य निरपराध नागरिक बळी पडले तसेच वर्धिनीच्या परिवारांमधील खालील व्यक्तींचे दु:खद निधन झाले. या सर्वांच्या कुटूंबियांच्या दु:खात वर्धिनी सहभागी आहे.

- श्री. एन. पी. तथा नाना जोशी
- श्री. गौतम कांबळे
- श्री. पांडुरंग गायकवाड
- श्रीमती हिराबाई भास्कर भावे
- प्राचार्य डॉ. सत्यरंजन साठे
- श्री. नानासाहेब शहाणे
- श्री. राजाभाऊ भोसले (रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक.)
- श्रीमती शुभदाताई बदामीकर
- श्रीमती अंजनीबाई माशेलकर
- श्री. लक्ष्मणराव देवपूरकर
- श्री. वि.ग.भिडे (माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ),
- डॉ. माधवराव परांजपे,
- श्रीमती कमलाबाई प्रभाकर कुलकर्णी
- श्रीमती आरती अनील हायगुंडे
- संघचालक श्री. मल्लाप्पा सोलापूरे
- डॉ. अरविंद लेले.
- श्री. कृष्णाजी सदाशिव तथा दादासाहेब डिंबळे
- श्री. नरेंद्र बोईन

---



वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री वसंतराव दाते यांचे वृद्धपकाळामुळे ६ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. श्री दाते सरांनी सुरुवातीच्या काळात अनेक वर्षे वर्धिनीचे हिशेब ठेवण्याचे काम यशस्वीरित्या तर सांभाळलेच पण हिशेब व्यवस्थित ठेवण्यासाठी शिस्त लावली. स्वामी विवेकानंद शाखा तसेच स्वामी सुबोधानंद शाखा सुरु करण्यापासून या शाखा उत्तम उभ्या रहाण्यासाठी त्यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. विसर्जन मिरवणूकीमध्ये तुळशीबाग मित्र मंडळ या मानाच्या गणपती मंडळाबरोबरचा सहभाग कै. दाते सरांमुळेच सुरु झाला.



हा जो आपला समाज आहे त्या संपूर्ण समाजातील सर्व व्यक्ती एकाच चैतन्याने ओतप्रोत आहेत.

# आर्थिक स्वास्थ्य चिकित्सा

शरीर स्वास्थ्य उत्तम असेल तर माणसाला आपल्या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने जायला बळ मिळतं.
सामाजिक संस्थांच्या बाबतीत उद्देशपूर्तीसाठी सक्षम मनुष्यबळ आणि पुरेस आर्थिक बळ या दोन्ही गोष्टी महत्वाच्या ठरतात. यातील एखादे बळ जरी कमी पडले तरी समस्या उद्‌भवतात असा सर्वसाधारणपणे अनुभव येतो.

माणसंच आर्थिक बळ उत्पन्न करतात आणि अशी माणसं आपल्या कामातून उभी करण्यासाठी संघटनात्मक काम मजबूत व्हावं लागतं. आजच्या परिस्थितीत अस काम सुव्यवस्थीत करण्यासाठी होणाऱ्या अपरिहार्य खर्चासाठी आर्थिक बळ हे लागतेच. या गोष्टी जमवून आणणे ही कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेची कसोटी असते.

या पार्श्वभूमीवर २००६ या वर्षामध्ये मनुष्यबळ प्रशिक्षित करण्याच्या, घडविण्याच्या दिशेने झालेल्या धडपडीचे वृत्त आपण वाचले असेलच. या वर्षातील वर्धिनीच्या आर्थिक स्वास्थ्याची चिकित्सा होणंही महत्वाचं आहे. या बाबतीत असं म्हणता येईल की, १००% आयकर सवलत प्राप्त असल्यामुळे या वर्षात आवश्यक तेवढा निधी गोळा होण्यात अडचण आली नाही. उलट वर्षाअखेरीला रुपये १४,४६,२६६.७९ इतकी मोठी रक्कम शिल्लक असल्याचे दिसेल. एवढी मोठी रक्कम शिल्लक दिसल्यावर स्वाभाविकपणे मनात प्रश्न उभा राहील की, एवढी रक्कम शिल्लक का राहिली? आर्थिक ताळेबंदाच्या तपशीलात गेल्यावर लक्षात येईल की केवळ मार्च महिन्यामध्ये देणगीरुपाने रुपये १२,७२,०६९/- इतकी रक्कम वर्धिनीच्या कोषात जमा झाली आहे. एवढी रक्कम एकाच व तेही आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात जमा झाल्याने ती शिल्लक राहाणे अपरिहार्य होते. अर्थात पुढील वर्षातील संकल्प पूर्तीसाठी ही श्री शिल्लक उपयोगी पडणार आहे.

खर्चाच्या बाजूचा विचार केला तर खालील आकडेवारी व आलेख पुरेशी स्पष्ट कल्पना देईल असा विश्वास वाटतो.

वर्षभरातील एकूण खर्च (घसारा सोडून) - रु. १७,९९,२९०.१०


उद्दिष्टांवरील एकूण खर्च - रु. १४,१५,०५५.२०

व्यवस्थापकीय एकूण खर्च - रु. ०३,०४,७७४.९०

विविध करांपोटी झालेला खर्च- रु. ७९,४६०.००



**आवाहन :** नित्य चालू असलेल्या कामाची वाढ आणि संकल्पित शिबिर संकूल निर्मितीसाठी होणाऱ्या खर्चासाठी आपले आर्थिक सहकार्य मिळत रहावे. आलेला प्रत्येक रुपया हा योग्य कामी खर्च होईल याची काळजी आम्ही निश्चित घेऊ.



**मानवाचा धर्म एकच असावा । सत्याने वर्तावा । ज्योती म्हणे ॥**
- (महात्मा फुले)

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभाग प्रमुख - श्री. अमोल उंदरे**

**१) रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११.
शाखाप्रमुख - **श्री.ललित माळी**
युवकप्रमुख - **श्री.शैलेश पैलवान**

**२) स्वामी विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर, वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. अमर ठाकूर**
युवकप्रमुख - **श्री.संदीप जोगळे**

**३) स्वामी अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय, बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. हर्षद कुलकर्णी**
युवकप्रमुख - **श्री. विनोद बिबवे**

**४) स्वामी सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत, कर्वेनगर, पुणे - ५२
शाखाप्रमुख - **श्री. स्वप्नील धालवडे**
युवकप्रमुख - **श्री. अजीत नाईक**

**५) स्वामी योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे-३०
शाखाप्रमुख - **श्री. राकेश चाळके**
युवकप्रमुख - **श्री. प्रशांत वेदपाठक**

**६) स्वामी अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे-१६
शाखाप्रमुख - **श्री.स्वप्नील येनपुरे**
युवकप्रमुख - **श्री.मंदार रायरीकर**

**७) स्वामी दयानंद सरस्वती शाखा**
विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. प्रशांत कवडे**
युवकप्रमुख - **श्री.विनोद बिबवे**

**८) स्वामी श्रद्धानंद शाखा**
महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय घोरपडे पेठ, पुणे - ४२
**शाखाप्रमुख - श्री. नीलेश धायरकर**
युवकप्रमुख - **श्री. संदीप मोरे**

**९) स्वामी ब्रह्मानंद शाखा**
म.न.पा. शाळा क्र.१६८, हिंगणे खुर्द, पुणे - ५१
शाखाप्रमुख - **श्री. धनंजय डोबे**
युवकप्रमुख - **श्री. अजीत नाईक**

**१०) भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे-११
शाखाप्रमुख - **कु.सुप्रिया फुलावरे**
युवतीप्रमुख - **कु. लता टिळेकर**

**११) आजोळ**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **सौ. मंजूषाताई कुलकर्णी**
सहाय्यक- कु.मधुमिता निलाखे, कु.मधुरा कारेकर
संपर्क - सो. ते शुक्र. स. १.३० ते ५

**१२) वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **श्रीमती तस्लीम फणीबंद**
सहाय्यक - सौ. प्रिती शहा, कु. दिपाली कोल्हे

**१४) शारदामणि महिला विभाग**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
(संपर्क-सोम. ते शुक्र. स. १० ते १, शनि. ९ ते १०.३०)
**महिला विभाग प्रमुख - श्रीमती पुष्पाताई नडे**
**'पाकोळी' बालवाडी प्रमुख:सौ. स्वातीताई कारेकर**
**बचतगट समन्वयक - सौ. वासंती कुलकर्णी**
**नेत्रचिकित्सा प्रकल्प समन्वयक : श्रीमती सुजाता कुदळे, श्रीमती सुरेखा माळी**
**उद्योग शिक्षण - सौ. विजयाताई कुलकर्णी, सौ. लता सत्तुर, सौ. माधुरी गुरव**
**ग्रंथालय - श्रीमती नीला कुडलिंगार,**
**साक्षरता प्रसार - श्रीमती सुगंधा कबीर**

**१५) संगणक विभाग**
विभागप्रमुख - **श्री अविनाश जोशी**
श्री. निशिकांत वाईकर,ओंकार सोनावणे
संपर्क - सोम. ते शुक्र. दु. १२ ते सायं.५

**१६) स्पर्धापरीक्षा व स्वयंवरोजगार मार्गदर्शन केंद्र**
केंद्र प्रमुख - कु. आरती बोराडे
संपर्क - सोम. ते शनिवार दु. १२ ते ५ सायं ६ ते ८

**१७) फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**
विभागप्रमुख - **श्री. सुनील कुलकर्णी**
सहायक - श्री. प्रशांत कवडे

**१८) मृद्गंध गिरीभ्रमण गट**
विभागप्रमुख - **वैद्य विनेश नगरे**
सहायक - श्री. चंदन हायगुंडे

**'हिन्दव: सोदरा: सर्वे'**

**कार्यालयीन व्यवस्थापक -**
**श्री. शिवदास शंकर तथा आप्पासाहेब पोतदार,**

**कार्यालय** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, सौ. प्रगती तांबट
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०) **संपर्क** - सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं.६.१५ ते रात्री ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखापालक :**
श्री. दि. दा. जोशी
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे - ३७.

## असे उपक्रम... असे तास .... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ पर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ८ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योगशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प *
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**रविवार सोडून अन्य दिवशी चालणारे उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) नेत्रचिकित्सा विभाग


**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) - प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र - प्रत्येक मंगळवार

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरीत सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.


**'एकम् सत् विप्रा: बहुधा वदंति'**

## प्रार्थना






नमस्कार देव तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥
हिचे रुप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरुनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥ १॥



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥ २॥

स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास - यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती - ध्यास हा ॥३॥





प्रभो तू चिदानंदरुपी असोनी
अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥ ४ ॥

**राष्ट्राय स्वाहा: ! राष्ट्राय, इदं न मम !**



## भारतमाता एकच दैवत

भारतमाता एकच दैवत येत्या दिवसांचे ।
इतर देव हे नाममात्र अन् केवळ नवसांचे ।
असे हे शब्द नरेंद्राचे ॥
युगयुग अपुल्या भरणपोषणा । असुरांपासुन नित्य रक्षणा ।
या मातेचे आशीर्वादच अपुल्या हक्काचे । असे हे शब्द नरेंद्राचे ॥
खरे, स्वयंभू, जागृत, पावन । दैवत हे तर अपुले आपण ।
नाहि दुरावा, द्वैत न उरले देवाभक्तांचे । असे हे शब्द नरेंद्राचे ॥
या देशातील हे नारीनर । सन्मानाने जगावेत जर ।
आपसातले विसरू भांडण अनंत शतकांचे । असे हे शब्द नरेंद्राचे ॥
कसले उत्सव, कसल्या यात्रा । दैन्य जोवरी, अन्न न पात्रा ।
वेदान्ताशी जोडू विक्रम, ध्येय भारताचे । असे हे शब्द नरेंद्राचे ॥
स्मरूनी केवळ ते गतवैभव । लोपत नाही दरिद्र वास्तव ।
यत्न हवे आनंद लाभण्या, बोल विवेकाचे । असे हे शब्द नरेंद्राचे ॥

SWAROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR-24511 / 13/ 1/ 2003-TC
PHM / SR / 235 / VIII / 03
Concessional postage under Regd No. L2 / RNP / M / 320 / 04-07
DT. OF PUBLICATION - 25th every month DT. OF POSTING - 25th at PSO Mkt'yd Pune

हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग. १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११ येथे प्रसिद्ध केले.

वर्ष चौथे, अंक पहिला